# विरोधक म्हणतात, थापांचा अर्थसंकल्प सत्ताधाऱ्यांच्या मते माय-बापांचा

### मूल्यमापनासाठी उच्चस्तरीय समिती

**मुंबई ।** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात विविध समाज घटकांसाठी नवीन योजना घोषित केल्या आहेत. आता या सर्व योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी योजनांचे मूल्यमापन करून त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे. मात्र, या समितीत नेमका कुणाचा समावेश असेल हे पवार यांनी स्पष्ट केलेले नाही . त्यामुळे या योजनांचे भवितव्य उच्चस्तरीय समितीच्या हाती असणार आहे.


देशदूत
शिल्पकार विकासाचा...


### बेजबाबदार अर्थसंकल्प-पाटील

**मुंबई ।** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या सरकारचा शेवटचा अर्थसंकल्प मांडला असून हा अर्थसंकल्प म्हणजे 'चादर लगी फटने और खैरात लगी बटने' असा आहे. लोकसभा निवडणुकांचा चांगलाच परिणाम राज्यात झालेला दिसत आहे. आता पराभव समोर दिसत असताना, आजच्या अर्थसंकल्पातून शेवटचा प्रयत्न महायुती सरकारने केला आहे. हा प्रयत्न देखील तीन महिन्यांसाठी असून आज सादर झालेला अर्थसंकल्प हा बेजबाबदारपणे मांडलेला आहे.


इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २६ । अंक २१६ । शनिवार, दि. २९ जून २०२४ । पाने ८+४ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### धीर सोडू नका!

'नीट' परीक्षा घोटाळयावरुन लोकसभेच्या संसदीय अधिवेशनात विरोधक आणि सरकार यांच्यात घमासान चर्चा झाली. या परीक्षेवरुन विद्यार्थी आणि पालकांमध्येही संभ्रमावस्था आहे. परीक्षा कधी होईल? कशी होईल? पुन्हा पेपर फुटेल का? केलेला अभ्यास वाया जाईल का? असे अनेक प्रश्न त्यांना पडले असणार. यंदाच्या 'नीट'चा निकाल जाहीर झाल्यांनतर काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले होते. केवळ नीटच नव्हे तर अगदी दहावी किंवा बारावीच्या परीक्षेचा ताण किंवा निकाल हेही मुलांच्या आत्महत्येचे एक कारण आढळते. तशी घटना घडणारी कुटुंबे उद्ध्वस्त होतात. बहुसंख्य पालकांची स्वप्ने मुलांवर केंद्रित असतात. मुले अकाली कायमची निघून जाण्याने त्यांच्या पालकांच्या वाट्याला फक्त आयुष्याला पुरुन उरणारे दु:ख येते. थोडेसे मनासारखे नाही झाले तर मुले निराशेच्या गर्तेत जातात. निराशा हाताळायला अनेकांना जमत नाही. कारण भावना कशा हाताळायच्या हे मुलांना शिकवलेच जात नाही. मुलांना ताण का येतो? ते निराशाग्रस्त का होतात? प्रसंगी आत्महत्येसारखेच पाऊल का उचलतात? कारण परीक्षा उत्तीर्ण होण्यालाच अधिक महत्त्व दिले जातांना आढळते. अनुत्तीर्ण मुलांची समाज हेटाळणी करतो. त्यांना जगण्यालाच नालायक ठरवले जातांना आढळते. तथापि परीक्षा आणि त्याद्वारे केले जाणारे करिअर हा आयुष्याचा एक भाग आहे. आयुष्यात यशस्वी होण्याला परीक्षा मदत करते पण ते म्हणजे सर्वस्व नव्हे याची जाणीव विद्यार्थ्यांना करुन दिली जाणे गरजेचे आहे. मुलांचा शैक्षणिक काळ गुणांभोवती फिरतो. आयुष्य आनंदाने जगण्यासाठी शिक्षणाबरोबरच अनेक क्षमता आवश्यक असतात. आव्हानांवर मात करणे, छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद मानणे, संवाद साधणे, प्रामाणिकता, प्रयत्नांवर दृढ विश्वास या त्यापैकीच काही. त्याची जाणीव मुलांना करुन देणे आणि त्या त्यांच्या स्वभावात रुजवणे

पान २ वर

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1750 |
| नवती (२) | : 1600 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

### मिश्कीली




# विधानसभेसाठी महायुतीची मतपेरणी

## शेतकऱ्यांना मोफत वीज; तीन गॅस सिलिंडर मोफत

**मुंबई ।** लोकसभा निवडणुकीत पराभवाचा जबर फटका बसलेल्या सत्ताधारी महायुती सरकारने येत्या ऑक्टोबर महिन्यात होऊ घातलेली विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आपल्या शेवटच्या अतिरिक्त अर्थसंकल्पातून मतपेरणी केली आहे. राज्यातील महिला, तरुण, शेतकरी, सामाजिक दुर्बल घटकांना आकर्षित करण्यासाठी सरकारने अतिरिक्त अर्थसंकल्पातून घोषणांची अक्षरश बरसात करत विधानसभा निवडणुकीत मतांचे पीक काढण्याचा प्रयत्न केला आहे. मध्यप्रदेश, राजस्थान सरकाराच्या धर्तीवर महिलांना खूश करणाऱ्या योजना जाहीर करून सरकारने या वर्गाला चुचकारले आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचे जाहीर करीत त्यांचा रोष कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सततच्या इंधन दरवाढीने हैराण झालेल्या जनतेला इंधनावर आकारल्या जाणाऱ्या मूल्यवर्धित करात कपात करून महायुतीने दिलासा दिला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फेब्रुवारी महिन्यात चालू आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंतरिम अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अजित पवार यांनी शुक्रवारी विधानसभेत सन २०२४-२५ या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. पवार यांनी वित्त आणि नियोजनमंत्री म्हणून मार्च २०११ मध्ये पहिला अर्थसंकल्प सादर केला होता. तेव्हापासून त्यांनी आज सादर केलेला हा दहावा अर्थसंकल्प आहे. पवार यांनी आपल्या भाषणाची सुरुवात संत तुकारामांच्या अभंगाने करत पंढरपूरच्या विठू माऊलीला वंदन केले. हरिनामाचा गजर करत त्यांनी अर्थसंकल्प वाचून दाखवला. विधान परिषदेत शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी अर्थसंकल्प मांडला.

### ही लाडका बेटा योजना नाही-शिंदे

आम्ही राज्यातील महिलांसाठी अनेक योजना राबविल्या तर उध्दव ठाकरेंनी अडीच वर्षात लाडका बेटा योजनाच राबवली अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या आरोपांवर केली.आमचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक आहे. आम्ही सर्वसामान्यांचे सरकार जेव्हा म्हणतो तेव्हा शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, बघिणी, युवा, ज्येष्ठ, वारकरी सगळे त्यामध्ये आले. आज अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना. अतिशय महत्त्वाची योजना आहे. आमच्या बहिणींच्या बँक खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा होणार. त्याचबरोबर महिलांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा असतो तो जेवण बनवायला गॅस. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना अंतर्गत वर्षाला तीन सिलेंडर मोफत देणार. त्यामुळे विरोधक गॅसवर आले आहेत, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली.

### हा माय-बापांचा संकल्प-फडणवीस

अजित पवारांनी मांडलेला अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक असून शेतकरी, महिला, युवा, मागासवर्गीय अशा सर्व घटकांच्या इच्छा पूर्ण करणारा आहे अशी स्तुतीसुमने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उधळली. हा थापांचा अर्थसंकल्प नाही तर मायबापांचा अर्थसंकल्प असल्याचे ते म्हणाले. सरकारने दिलेली सर्व आश्वासने ही निर्धारित वेळेत पूर्ण केली जातील असे आश्वासनही देवेंद्र फडणवीसांनी दिले. त्याला प्रत्युत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा अर्थसंकल्प हा सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करणारा आहे. हा थापांचा नाही तर मायबापांचा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देणारा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

### लाडकी बहीण योजना

शेजारच्या मध्यप्रदेशात राबवल्या जात असलेल्या योजनेच्या धर्तीवर अजित पवार यांनी सरकारची महत्वाकांक्षी अशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेच्या अंतर्गत २१ ते ६० वर्ष वयोगटातील पात्र महिलांना राज्य सरकारच्या वतीने महिना १ हजार ५०० रुपये देण्यात येतील. या योजनेसाठी दरवर्षी ४६ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार असून योजनेची अंमलबजावणी जुलै २०२४ पासून करण्यात येईल, अशी घोषणा अजित पवार यांनी केली.

### शेतकऱ्यांना मोफत वीज

लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला शेतकऱ्यांच्या संतापाला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे बळीराजाला खूश करण्यासाठी अजित पवार यांनी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना घोषित केली. त्यानुसार राज्यातील ४४ लाख ६हजार शेतकऱ्यांच्या साडेसात अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना मोफत वीज पुरवठा केला जाईल. त्यासाठी १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येतील, अशी घोषणा पवार यांनी केली. शेतकऱ्यांना खरेच मोफत वीज मिळून घोषणा प्रत्यक्षात येणार काय? याची चर्चा सुरु झाली आहे.

### वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत

घरातील प्रत्येक गृहिणीच्या जिव्हाळ्याच्या असलेल्या स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरसाठी अजित पवार यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना घोषित केली. या योजनेतून वर्षाला प्रत्येक पात्र कुटुंबाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्यात येतील. ही योजना पर्यावरण संरक्षणाला सहाय्यभूत ठरेल आणि राज्यातील ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना लाभ मिळेल, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

### वारकऱ्यांसाठी महामंडळाची घोषणा

आज देहूतून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाल्याचा संदर्भ देत अजित पवार यांनी आपल्या भाषणात कीर्तनकार, वारकरी, भजनीमंडळ यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच पालखी मार्गाचे व्यवस्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याची घोषणा अजित पवार यांनी केली.

### हा तर थापांचा महापूर-ठाकरे

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली. अजित पवार यांनी आज सादर केलेला अर्थसंकल्प हा अश्वासनांची अतिवृष्टी आणि थापांचा महापूर असल्याची खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली. गेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या आश्वासन आणि थापांना कंटाळून चिडलेल्या महाराष्ट्राने जो काही त्यांना दणका दिला त्याने सत्ताधाऱ्यांचे डोळे थोडेसे किलकिले झालेले दिसत आहेत. तरीदेखील जनता त्यांच्या थापांवर विश्वास ठेवेल, असे मला वाटत नाही. महाराष्ट्रातील जनता ही सुजाण, सज्ञान आणि स्वाभिमानी आहे. कितीही फसवण्याचा प्रयत्न केला, तरीदेखील महाराष्ट्र ओरबाडून गुजरातला नेण्याचे षडयंत्र हे उघड झाले आहे. महाराष्ट्र गुजरातच्या पाठी गेलेले आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### ठिगळांचा खोकेसंकल्प-वडेट्टीवार

फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प सादर केला आहे. अडीच वर्ष फक्त घोटाळे, टेंडर, कमिशन, टक्केवारी यातून मालामाल झालेल्या या महाभ्रष्टाचारी सरकारने आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला आहे. महिलांसाठी योजना आणून या सरकारने प्रायश्चित्त घेतले आहे. अर्थसंकल्पाच्या आडून महायुतीच्या आमदारांना खूश करण्यासाठी केलेला हा शेवटचा प्रयत्न म्हणजे हा अतिरिक्त संकल्प आहे. सरकारी तिजोरीवर महायुती सरकारने शेवटचा हाथ मारून तिजोरी साफ केली आहे. स्वत:चे खोके भरून झाल्यावर जनतेसाठी केविलवाणा प्रयत्न अर्थसंकल्पात केला आहे.



पुणे । टाळ-मृदंगाचा गजर, विणेचा झंकार, आणि जय जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल नामाचा जयघोष अशा भक्तिरसाने भारलेल्या वातावरणात संत तुकाराम महाराजांच्या पालखीने शुक्रवारी पंढरपूरच्या दिशेने प्रवास सुरु केला. रात्री ही पालखी इनामदार वाड्यात मुक्कामाला पोहोचली.

## भक्तांच्या बसवर काळाचा घाला; १३ जणांचा मृत्यू

**बेळगाव ।** यल्लम्मा देवीचे दर्शन घेऊन परतीचा प्रवास करणाऱ्या भाविकांच्या बसला भीषण अपघात. ब्यादगी तालुक्यात एक मिनी बसने रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार टक्कर दिली. टक्कर इतकी भीषण होती की बसमधील १३ जणांचा जागीच मृत्यू झाला,तर दोघे जण गंभीर जखमी आहेत सध्या त्यांचावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. राष्ट्रपतींनी घटनेवर दु:ख व्यक्त केले आहे.



यल्लम्मा देवीचे दर्शन घेवून भाविकांची बस सौंदत्ती वरुन निघाली होती. सारे झोपेत असतानाच त्यांना मृत्यूने कवटाळले. कर्नाटकमधीस हावेरी जिल्ह्यातील ब्यादगी तालुक्यात मिनी बसने रस्त्याचा बाजूला उभ्या असणाऱ्या ट्रकला मध्यरात्री धडक दिली. सारे भाविक शिवमोगा येथील राहणारे आहेत असे पोलिसांनी सांगितले. जखमी सुद्धा गंभीर असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. दरवर्षी हजारो भाविक सौंदत्तीला यल्लम्मा देवीच्या दर्शनाला जात असतात.









## निदर्शन करताना काँग्रेसच्या महिला खासदार बेशुद्ध

**नवी दिल्ली ।** शुक्रवारी राज्यसभेत विरोधक नीट परीक्षेतील गैरव्यावहारावरुन निदर्शने करत होते. यावेळी काँग्रेसचे खासदार फुलो देवी नेताम यांची प्रकृती खालावली. फुलो देवी यांना तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले. सभागृहात निदर्शने करत असताना ही घटना घडली. गदारोळ सुरु असताना फुलो देवी यांची तब्येत बिघडली. यानंतर सहकारी खासदारांनी फुलो देवी यांना सांभाळले. त्यानंतर तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. फुलो देवी यांना संसदेच्या संकुलात नेल्याचा व्हिडिओ देखील समोर आलाय. आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवालही पुढे बसलेल्या दिसत होत्या. यावेळी संसदीय कार्यमंत्री किरण रिजाजू यांच्यासह काँग्रेसच्या राज्यसभेतील काही खासदारांनीदेखील रुग्णवाहिका संसद भवनात बोलावली होत.



## माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना जामीन

**रांची ।** झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना झारखंड हायकोर्टाने जामीन मंजूर केला आहे. कथित जमीन घोटाळ्यात गेल्या अनेक दिवसांपासून हेमंत सोरेन हे अटकेत आहेत. हायकोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आल्याने सोरेन यांना मोठा दिलासा मिळाला आहे. झारखंडमधील भूमाफियांनी बेकायदेशीरपणे मालकीमध्ये बदल करून जमिनी हडप केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या सक्तवसुली संचालनालयाने काही महिन्यांपूर्वी हेमंत सोरेन यांना अटक केली होती. या कारवाईमुळे सोरेन यांना मुख्यमंत्रिवरूनही दूर व्हावं लागले होते. या प्रकरणी ईडीने याआधी १४ जणांना अटक केली होती. यामध्ये आयएएस अधिकारी छवी रंजन यांचाही समावेश आहे. दरम्यान जामीन मिळाल्यानंतर शुक्रवारीत हेमंत सोरेन कारागृहाबाहेर आले आहे.



## शॉर्ट न्यूज

### मातृवंदना योजनेसाठी विशेष मोहीम

■ धुळे । प्रतिनिधी

माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती माता व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करुन त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचेही आरोग्य सुधारावे आणि मातामृत्यू व बालमृत्यु दरात घट होऊन तो नियंत्रित राहावा यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरु केली आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी १८ जून ते २ जुलै या कालावधीत ऑनलाईन नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके यांनी दिली आहे.

### शेतकऱ्यांनी ई-केवायसी करावी

■ धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांना ई-केवायसी व संमतीपत्राअभावी अनुदान वितरीत करणे प्रलंबित आहे. अशा शेतकऱ्यांनी अनुदानप्राप्त करण्यासाठी नजीकच्या आपले सरकार केंद्रावर जावून ई-केवायसी करावी. सन २०२२ पासून धुळे जिल्ह्यात वेळोवेळी झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाले होते. त्याबाबत पंचनामे करण्यात आले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत वाटपाबाबतचे अनुदान मंजूर झाले आहे. मंजूर झालेले अनुदान संबंधित लाभार्थ्याच्या बँक खात्यावर डीबीटीद्वारे अदा करण्यासाठी लाभार्थ्यांनी नजीकच्या आपले सरकार केंद्रावर ई-केवायसी करणे आवश्यक आहे. सेवा केंद्रावर ही सेवा नि:शुल्क आहे. त्याचप्रमाणे सामुहिक खातेदार असल्यास अशा शेतकऱ्यांनी त्यांचे खात्यातील एका खातेदाराच्या नावाने संमतीपत्र तलाठी यांचेकडे दाखल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

### फसल बिमा योजनेची अंमलबजावणी

■ धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारकडून खरीप हंगामाकरिता प्रधान मंत्री फसल बिमा योजनेची (पीएमएफबीवाय) अंमलबजावणी करण्यासाठी एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्सची नेमणूक केली असून ही अंमलबजावणी कर्जदार आणि कर्ज न घेतलेल्या उस्मानाबाद, धुळे, पुणे, हिंगोली आणि अकोला जिल्ह्यातील २०२४ साठी ही अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी पिकांसाठी असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पिकानुरुप व देण्यात आलेल्या तारखांनुसार करण्यात येणार आहे.पीएमएफबीवाय योजने अंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या बाह्य धोक्यांपासून विमा संरक्षण दिले जाते. विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी आणि अधिक माहितीसाठी शेतकरी कृषी विभागाच्या वेबसाईटला भेट देऊ शकतील. आता शेतकरी फार्मर्स ॲपवर किंवा https://pmfby.gov.in/farmerLogin या वेबसाईटला भेट देऊन या योजनेत स्वत: नाव नोंदणी करु शकतील.

### एमपीएससी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण

■ धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या स्वायत्त संस्थेमार्फत राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास प्रवर्गातील (एसबीसी) विद्यार्थ्यांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण राबविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) संयुक्त गट ब व क स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी महाज्योतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया २७ जूनरोजी पासून सुरु केलेली आहे. अशी माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी दिली आहे. प्रशिक्षणासाठीचे अर्ज महाज्योतीच्या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत. महाज्योतीमार्फत प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्यात विद्यावेतन देखील देण्यात येणार असुन प्रशिक्षणासाठी रुजु होताना एकरकमी आकस्मिक निधी देखील देण्यात येणार आहे.

# शैक्षणिक अडचणी सोडविण्यासाठी त्रिस्तरीय समिती गठीत

## विविध बाबींवर ठेवणार लक्ष, नागरिकांना ऑनलाईन तक्रार करण्याची सुविधाही उपलब्ध

■ धुळे । प्रतिनिधी

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ चे कलम ३२ नुसार जिल्ह्यात संस्थाचालकांसह शिक्षक व शैक्षणिक अडचणींची सोडवणूक करण्यासाठी त्रिस्तरीय तक्रार निवारण समितीचे गठण करण्यात आले आहे. नागरिकांना तक्रार निवारण समितीकडे ऑनलाईन तक्रार करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिक्षण हक्क कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या समित्या कार्यरत असल्याची माहिती जि.प.चे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी महेंद्र सोनवणे यांनी दिली.

मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्व बालकांना मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क कायद्याने प्रदान करण्यात आला आहे. शिक्षण हक्क कायद्याच्या कलम ३२ (१) नुसार दाखल तक्रारीची सोडवणूक करण्यासाठी जिल्ह्यात त्रिस्तरीय तक्रार निवारण समित्यांचे गठण करण्यात आले आहे. त्यात तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर समित्यांचे गठन केले असून या समिती अंतर्गत शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, वयानुरूप वर्गात प्रवेश, विशेष प्रशिक्षण, जनजागृती, दुर्बल व वंचित घटकातील मुलांची शैक्षणिक प्रगती, २५ टक्के प्रवेश, शारीरिक शिक्षा, मानसिक छळ, जात, लिंग, धर्म, क्षेत्र, भाषा या बाबत होणारे भेदभाव टाळणे, शिक्षकांकडून घेण्यात येणाऱ्या खाजगी शिकवण्यांवर वचक ठेवणे, मोफत सुविधा, वेळेवर पाठ्यक्रम पुर्ण करणे आदी बाबींवर लक्ष ठेवण्यात येत असते. शाळा किंवा संस्थाचालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्यास त्या संदर्भात सरळ समितीकडे तक्रार दाखल करता येते. तालुकास्तरीय समितीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात तर जिल्हास्तरीय समितीने दुसऱ्या आठवडयात व राज्यस्तरावर तिसऱ्या आठवडयात तक्रार निवारण समितीकडून तक्रारींचा आढावा घेण्यात येत असतो.

तक्रार निवारण समितीची रचना- तालुका स्तरावर गटविकास अधिकारी व महापालिका क्षेत्रात उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली प्रभागनिहाय समितीचे गठण करण्यात आलेले आहे. त्याच बरोबर जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी व महापालिकास्तरावर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अपिलीय समिती आहे. तसेच राज्य स्तरावर शिक्षण विभागांच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण आहे. या समितीत सदस्य सचिव म्हणून शिक्षण संचालक तर सदस्य म्हणून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे सहसंचालक कार्यरत आहेत. समितीकडे तक्रार दाखल झाल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत तक्रारीचा निपटारा करणे सक्तीचे आहे. तालुकास्तरीय समितीने दिलेल्या निकालावर समाधान झाले नाही तर ३० दिवसाच्या आत जिल्हास्तरावर व ४५ दिवसाच्या आत राज्यस्तरीय समितीकडे तक्रार करण्याची सुविधा आहे. तसेच समितीने अंतिम निर्णय दिल्यानंतरही तक्रारदारास राज्य बालहक्क सरंक्षण आयोगाकडे अपिल करता येऊ शकते,

ऑनलाईन तक्रारींची दखल- पालक व शिक्षण क्षेत्रातील तज्ञ तसेच आस्था असलेल्या नागरिकांना तक्रार करणे सोयीचे व्हावे म्हणून ऑनलाईन तक्रारांची समितीकडून दखल घेतली जाणार आहे. त्यासाठी नगरपालिका, महापालीका, जिल्हा परिषद यांना तक्रारीसाठी पोर्टलवरिल कप्लॅन्ट रिडर्सल सिस्टिम सक्रीय करण्यात आली आहे. या त्रिस्तरीय तक्रार निवारण समितीकडे पहिली ते बारावी पर्यतच्या तक्रारी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्याच बरोबर टपाल, फॅक्स, कुरीयर अथवा प्रत्यक्ष शिक्षणाधिकारी, महापालिका व नगरपालिकेचे शिक्षण मंडळ, गटशिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष देता येणार आहेत. तक्रारीनंतर तात्काळ तक्रारदार व्यक्तीला पोच देण्यात येईल.

### तर अशा शिक्षकांवर कारवाई

**शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये अध्यापन करीत असतांना अनेक शिक्षक खाजगी शिकवणी वर्ग चालवितात. मात्र असे कृत्य करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई संदर्भात ठोस उपाययोजना करण्यात आलेली नव्हती. मात्र मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क कायदा २००९ च्या कलम ३२ (१) नुसार अशा तक्रारीची दखल घेत शिक्षकांवर कारवाई करता येणार आहे. त्यामुळे शाळा व शिकवणी घेणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करता येणार आहे**




### याकडे देणार लक्ष

**सामान्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणणे. दुर्बल घटकांना शाळेत मिळणार प्रवेश. विद्यार्थ्यांमध्ये असलेला भेदभाव टाळणे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती तपासणे. जात, धर्म, लिंग पलिकडे शिक्षण देणे. शिक्षकांचे शैक्षणिक कामातील मुल्यमापन. खाजगी शिकवण्यावर बारीक लक्ष ठेवणे. नियमांचे उल्लंघन होत असल्यास कारवाई करणे. संस्थाचालकांनाही वेळोवेळी सूचना करणे. मोफत सुविधावर भर देण्यासह पाठ्यक्रम पूर्ण करण्याकडे विशेष लक्ष देण्यात**

# जिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र विभाग सुरू करा

### उबाठा शिवसेनेची मागणी

■ धुळे । प्रतिनिधी

येथील जिल्हा रुग्णालयात दिव्यांग डिसॅबिलिटी प्रमाणपत्र विभाग सुरू करावा, अशी मागणी उबाठा शिवसेनेतर्फे करण्यात आली आहे. तसे निवेदन जिल्हा शल्यचिकित्स डॉ. दत्ता देवगावकर यांना देण्यात आले.

सुरत बायपासवरील हिरे वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित सर्वोपचार रुग्णालयात दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्र मिळतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.दिव्यांगांना दिवसभर ताटकळत उभे राहावे लागते. अनेकदा सर्व्हर डाऊन असते. संबंधित विभागाचे डॉक्टर उपलब्ध नसतात. या ठिकाणी महिनामहिने प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र विभाग सुरू करावा, अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

यावेळी महानगर प्रमुख धीरज पाटील, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, कैलास मराठे, कपिल लिंगायत, भटु गवळी, अजय चौधरी, अमोल ठाकूर, तेजस सपकाळ आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.देवगावकर यांनी, शासनाकडे प्रस्ताव पाठवून महिनाभराच्या आत हा विभाग जिल्हा सर्वसामान्य रुग्णालयात प्राधान्यक्रमाने सुरू केला जाईल, असे आश्वासन दिले.

# दिव्यांगांचा राखून ठेवलेला निधी खर्च करा

■ धुळे । प्रतिनिधी

महापालिकेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिव्यांगांसाठी राखून ठेवलेला पाच टक्के निधी खर्च करावा. तसेच दिव्यांग वसाहत व भवनाची निर्मिती करावी, यासह यासह विविध मागण्यांचे निवेदन आज भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे महानगराध्यक्ष संजय सरग यांनी आयुक्त अमिता दगडे-पाटील यांना दिले. मागण्यांबाबत दखल न घेतल्यास दिव्यांगांचे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

महापालिका क्षेत्रात २ हजार ३९० दिव्यांगांची नोंदणी झालेली आहे. प्रति वर्षी दिव्यांगांची नवीन नाव नोंदणी व नोंदणी झालेल्या दिव्यांगांचे हयात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी महापालिकेतील दिव्यांग विभागाकडुन त्वरित सुरुवात करण्यात यावी. दिव्यांगांसाठी महापालिकेच्या माध्यमातून ५ टक्के निधी त्वरित खर्च करावा.

साक्री रोडवरील मच्छिबाजार परिसरात अनेक दिवसांपासून रिकामे पडलेले ओटे दिव्यांगांना व्यवसाय करण्याच्या दृष्टीकोनातून द्यावे. दिव्यांगांना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत स्वतंत्र लाभ देण्यात यावा. बेघर व हक्काचे घर नसलेल्या दिव्यांग कुटुंबास महापालिकास्तरावर दिव्यांग वसाहत निर्माण करावी. दिव्यांगांच्या संस्था, संघटनांना समितीत स्थान द्यावे. दिव्यांगाचा सामुहिक विमा काढावा. तसेच मनपा हद्दीत समाविष्ट दहा गावातील दिव्यांगांचा सर्व्हे करावा. शहरात दिव्यांग भवनाची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करावे, अशा मागण्या निवेदनातून केल्या आहेत.

यावेळी कमलाकर महानोर, दिनेश वाघ, राजेश शिकलकर, सुनिल ढोल, रविंद्र माळी, राजेंद्र चौधरी, सुनिल घटी, संतोष धुमाळ, सुनिल घटी, उमेश दुरो आदी उपस्थित होते.

### भाजपा दिव्यांग आघाडीचे आयुक्तांना निवेदन



# पुरमेपाडा रोपवनात बेकायदेशीर नांगरणी, तिघांवर वनविभागाची कारवाई

■ धुळे । प्रतिनिधी

धुळे तालुक्यातील पुरमेपाडा येथील वनविभागाच्या रोपवनात बेकायदेशीरपणे ट्रॅक्टर ट्रीलरने नांगरटी करणाऱ्या तिघांना वनविभागाने पकडले. याप्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना चार दिवसांची वनकोठडी सुनावण्यात आली आहे.

धुळे वनविभागाच्या आर्वी नियतक्षेत्रातील पुरमेपाडा बिटमध्ये चुडामण नगर ते सोनेवाडी रस्त्यास लागून कक्ष क्र.३२६ मध्ये रोपवन आहे. या क्षेत्रात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत संयुक्त वनव्यवस्थापन समितीने पुर्वपावसाळी कामे केली असू काहीजण या ठिकाणी ट्रॅक्टर ट्रिलरने नांगरटी करताना वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना आढळून आले. कर्मचाऱ्यांची चाहूल लागताच चालकाने ट्रॅक्टर ट्रिलरसह पळवून लावले. यावेळी कर्मचाऱ्यांनी तीन जणांना ताब्यात घेतले. त्यांनी खड्डे खोदकाम करण्यात आलेल्या ठिकाणी ट्रॅक्टरच्या सह्याने नांगरटी केल्याचे कबुल केले. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध वन गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास आर्वी वनपाल करीत आहेत. तिघांना न्यायालयात हजर केल्यानंतर चार दिवसाची वनकोठडी देण्यात आली.



ही कारवाई धुळे विभागाच्या वनसंरक्षक निनू सोमराज, उपवनसंरक्षक नितीन कुमार सिंग, विभागीय वन अधिकारी (दक्षता) राजेंद्र सदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे वनक्षेत्रपाल बी.पी. वाघ, वनपाल शांताराम मराठे, नितीन सांगळे, प्रेमसिंग पाटील, निंबा आखाडे, आरागिरणी प्रकाश सोनार, सुवर्णा उशीरे, वनरक्षक राकेश पाटील, सर्व वनरक्षक, वनमजूर आदींनी केली. दरम्यान, वनविभागाच्या जागेवर कोणीही अतिक्रमण करताना आढळल्यास अशीच कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा वनक्षेत्रपाल भूषण वाघ यांनी दिला आहे.

# व्यापाऱ्यांची एलबीटीच्या जाचातून सुटका करा!

■ धुळे । प्रतिनिधी

महापालिकेची खाजगी ठेकेदाराच्या मदतीने सुरू असलेली एलबीटी वसुलीची मोहिम व्यापाऱ्यांसाठी जाचक आणि त्रासदाय ठरत असून ही मोहिम थांबावावी, अशी मागणी आज धुळे व्यापारी महासंघातर्फे आयुक्त अमिता दगडे-पाटील यांच्याकडे करण्यात आली. तसे निवेदनही त्यांना देण्यात आले.

यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नितीन बंग, खेमजी पटेल, भीमजी पटेल, जयगोपाल दादलानी, प्रशांत देवरे, सुमित रुणवाल, साबीर शेख आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, मनपातर्फे खाजगी ठेकेदाराकडून स्थानिक संस्था कराच्या (एलबीटी) वसुलीबाबत निर्धारण प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार मनपा उपायुक्तांच्या स्वाक्षरीने व्यापारी बांधवांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. परंतु, दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने कमी उलाढाल असलेल्या व्यापारी वर्गाकडे कागदपत्रे उपलब्ध नाहीत. एलबीटी सुरू झाल्यानंतर पुरेशी माहिती नसतानाही अनेक व्यापाऱ्यांनी चुकून एलबीटी नंबर घेतला आहे. असे व्यापारी पूर्णपणे पेचात अडकले आहेत. तसेच याबाबत विचारणा करण्यासाठी एलबीटी कार्यालयात गेल्यानंतर अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याठिकाणी दोन ते तीन तास व्यापाऱ्यांना ताटकळत ठेवण्यात येते.

सद्य:स्थितीत एलबीटी कार्यालयात चुकीच्या लोकांचा वावर वाढला असून तेथे व्यापाऱ्यांना नीट वागणूक मिळत नाही. तसेच पुर्वीच्या ठेकेदाराला दिलेल्या कागदपत्रांची पुन्हा व्यापाऱ्यांकडून मागणी केली जात आहे. ठेकेदाराचे कर्मचारी नेमके कोण हे देखील समजत नाही. त्यामुळे ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांचे नाव, मोबाईल नंबरसह यादी उपलब्ध करून देण्याचीही मागणीही व्यापाऱ्यांनी निवेदनातून केली आहे.

### धुळे व्यापारी महासंघाचे आयुक्तांना निवेदन



# कृषी दिनानिमित्त प्रगतिशील शेतकऱ्यांचा होणार सत्कार

■ धुळे । प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषि दिन व डॉ.पंजाबराव देशमूख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कृषि संजीवनी पंधरवडा कार्यक्रमाची सांगता निमित्त १ जुलै रोजी पारोळा रोडवरील कृषि महाविद्यालयात सकाळी ९.३० वाजता कृषि दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जि.प.च्या कृषि विकास अधिकारी कावेरी राजपूत यांनी दिली.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील उत्कृष्ट प्रगतशील, प्रयोगशील शेतकरी फळबाग, सेंद्रीय शेती, प्रक्रिया उद्योग, युवा शेतकरी, महिला शेतकरी यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

तसेच कृषिदिनानिमित्त जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, युवा शेतकरी, महिला शेतकरी यांच्यासाठी शेतमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन, शासकीय योजना याविषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमास जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

थोडक्यात...



## रस्त्यावर पडलेली सोन्याची पोत एकाने प्रामाणिकपणे केली परत

**अमळनेर । प्रतिनिधी**

अनावधानाने महिलेची रस्त्यावर पडलेली सात ग्रामची सोन्याची पोत एकाने प्रामाणिक पणे महिलेला परत केल्याने बापू दोधु गरुड याचे कौतुक होत आहे.सखुबाई तुळशीराम भोई ही महिला पैलाड मारुती मंदिराजवळ घराबाहेर झोपलेली होती. महिलेने गळ्यातील सोन्याची पोत गळ्याबाहेर काढून ठेवली होती. १९ रोजी सकाळी उठल्यावर तिने गोधडी झटकून घडी केली व आवराआवर केल्याने पोत रस्त्यावर पडली. ती पोत बापू दोधु गरुड याला सापडली होती. पंकज भोई व इतरांनी पोत शोधण्याचा प्रयत्न केला असता बापू याने त्याला स्वतःला सापडली असल्याची प्रामाणिकपणे कबुली दिली. बापू गरुड व पंकज भोई यांनी महिलेच्या घरी जाऊन तिला सोन्याची पोत परत केली.बापूच्या प्रामाणिक पणाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



## गुढे येथील स्मशानभूमीत पाच वटवृक्षांच्या रोपांचे रोपण

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**

येथील सोसायटीचे माजी संचालक तथा श्री जगद्गुरू संत तुकाराम महाराज प्रतिष्टान संचालक रोहिदास पंडित पवार-पाटील यांनी स्वखर्चाने गावातील स्मशानभूमीत पाच वटवृक्षाच्या रोपट्याचे वृक्षारोपण केले आहे त्यांच्या या सामाजिक लोकोपयोगी कार्याचे कौतुक होत आहे याप्रसंगी युवासेनेचे उपतालुका राहुल पाटील,सामाजिक कार्यकर्ते वसंत पाटील,सचिन पाटील,विलास शेवाळे उपस्थित राहुन वटवृक्षाचे वृक्षारोपण केले.

## पारोळा नगरपरिषदेमार्फत माझी वसुंधरा ५.० अभियानअंतर्गत पर्यावरणदूतांची निवड

**पारोळा । श. प्र.**



प्रा.डॉ.संजय भावसार डॉ.प्रदीप औजेकर राहुल निकम

माझी वसुंधरा ५.० अभियान अंतर्गत पर्यावरण दुत म्हणून पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेले असे पर्यावरण प्रेमिंची निवड करण्यात येते. तर पारोळा नगरपरिषदेम ार्फत प्रा डॉ संजय भावसार, उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, डॉ प्रदीप औजेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी किसान महाविद्यालय पारोळा, राहुल निकम, सामाजिक कार्यकर्ता पारोळा यांची पर्यावरण दुत म्हणून निवड करण्यात आली कारण की, यांच्यामार्फत अनेक वर्षापासून पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य होतांना दिसून येत आहे ते पुढेही ही असेच कार्य सुरू ठेवतील ही अपेक्षा बाळगून किशोर चव्हाण मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद पारोळा यांच्या मार्गदर्शनाखाली या पर्यावरण दूतांची निवड करण्यात आली असून येणाऱ्या काळात पारोळा नगरपरिषद ही निवडण्यात आलेल्या पर्यावरण दूत यांच्याशी समन्वय साधून पर्यावरण क्षेत्रात विविध उपक्रम हे राबवेल. तसेच माझी वसुंधरा ५.० अभियानाची प्रभावीपणे जनजागृती व अंमलबजावणी करेल.



## अमळनेर येथे कुपोषित बालकांचे शिबिर

**अमळनेर ।प्रतिनिधी**

रोटरी क्लब अमळनेर व ग्रामीण रुग्णालय अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमानाने ग्रामीण रुग्णालय अमळनेर येथे २७-६-२०२४ वार गुरुवार रोजी कुपोषित बालकांचे शिबिर आयोजित करण्यात आले. त्यात बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली व रोटरी क्लब अमळनेर कडून प्रोटीन किटचे ३० डबे वाटप करण्यात आले, तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रांजली पाटील डॉ. पी.के तांबे यांच्या मार्गदर्शनाने बालरोग तज्ञ तथा वैद्यकीय अधिकारी रो.डॉ जी एम पाटील यांनी कुपोषित बालकांची आरोग्य तपासणी केली त्यामध्ये काही बालकांची रक्तांची चाचणी, एक्स-रे संदर्भ सेवा व सुविधा देण्यात आल्या, सदर कार्यक्रमात रोटरीचे नुतन अध्यक्ष रो. ताहा बुकवाला, रो. डॉ दिलीप भावसार, रो. प्रदीप पारख, रो.प्रतीक जैन, रो.देवेंद्र कोठारी उपस्थित होते व त्याचबरोबर या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी डॉ.सुमित पाटील, डॉ.गणेश पाटील, डॉ. परेश पवार,डॉ.तनुश्री दामले ,डॉ नरेंद्र पाटील, डॉ.प्रिया पटेल, सौ वैशाली पाटील, गिरीश शिंदे, आरोग्य सेविका पुनम नारे समुपदेशक अश्वमेध पाटील, अशोक सोनवणे, सीडीपीओ श्रीमती प्रेमलता पाटील यांनी मेहनत घेतली.

# पारोळा शहरातील अनेक समस्या न सुटल्यास भाजपातर्फे आमरण उपोषण

**पारोळा । प्रतिनिधी**

शहरातील नागरीकांच्या जिवाशी खेळण्याचे काम गेल्या दोन अडीच वर्षांपासुन सुरू आहे. हे सर्व पारोळा नगर पालीका व प्रशासक करीत आहेत. पारोळा शहरात अनेक समस्या आहेत या समस्यांबाबत आज दिनांक २७ जून रोजी मुख्याधिकारी तथा प्रशासक यांचे कर्मचारी यामिनी जटे यांना भारतीय जनता पार्टी तर्फे समस्या सोडविण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे. सम स्या न सुटल्यास भारतीय जनता पार्टीतर्फे आपल्या कार्यालयासम ोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

विशेष समस्या पारोळा शहरात १५-१५ दिवस पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नाही. याबाबत संपुर्ण पारोळा शहरात ७ दिवसा आड पाणी येईल असे नियोजन करावे, गटारी तुडूंब भरलेल्या आहेत,घाणीचे सम्राज्य पसरले आहे,शहरात डासांचे प्रमाण वाढले आहेत, शहरातील नगर पालीका मालकीचे हॅण्ड पंप बंद अवस्थेत पडलेले आहे, प्रत्येक गल्लीत घाणीचे साम्राज्य आहे, शहरातील व हायवे कडील बरेचशी स्ट्रीट लाईट बंद स्थीतीत आहे व त्याचे टर्मिनल बॉक्स उघड्या अवस्थेत आहेत, अमळनेर रस्त्यालगत पासुन ते महावितरण पर्यंत स्ट्रीट लाईट बंद अवस्थेत आहेत, आझाद चौक ते धरणगाव चौफुली धरणगाव चौफुली तर बायपास धरणगाव चौफुली पर्यंत पथदिवे बंद आहेत,पारोळा शहरात व नवीन वसाहतीमध्ये धुरळची फवारणी व्हावी, पाईप लाईन टाकण्यासाठी नगरपालीकेले सर्व पारोळा शहर खोदुन ठेवले आहे सर्व रस्ते खाली वरती झाले आहेत. त्या सर्व रस्त्यांची दुरूस्ती व्हावी व त्यांना सपाट करण्यात यावे.

या सर्व नागरी समस्यांचे निराकरण व्हावे. नाहीतर भारतीय जनता पार्टीतर्फे आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल.सदर निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव प्रांताधिकारी प्रांत कार्यालय, एरंडोल तहसिलदार, तहसिल कार्यालय, पारोळा यांना देण्यात आल्या आहेत.

सदर निवेदनावर रविंद्र भोमा पाटील तालुका अध्यक्ष, भाजपा, पारोळा मुकूंदा भिका चौधरी शहर अध्यक्ष, भाजपा, माजी नगराध्यक्ष गोविंद एकनाथ शिरोळे, सुरेंद्र बोहरा,सचिन रम




णलाल गुजराथी,भावडू राजपूत, नरेंद्र गंगाधर साळी, धिरज दशरथ महाजन,संकेत प्रविण दाणेन, अतुल मुरलीधर पवार, मनोज चौधरी, पंकज छोटू ठाकुर, किरण नाना चौधरी, विनोद हिंदुजा, कैलास मनोहर चौधरी, युवराज पाटील,भागवत आधार चौधरी,विनीत पाटील, स्टॅम्प वेंडर राजेंद्र लक्ष्मण चौधरी, पिंटू चौधरी, गोकुळ चौधरी, मनोज चौधरी, भरत राजपूत, समिर वैद्य, यांच्यासह भारतीय जनता पार्टी, पारोळा शहर व तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ...अन्यायकारक शासन निर्णयाची संगणक परिचालकाकडून होळी!

## ग्रामविकास विभागाने संगणक परिचालकांच्या तोंडाला पाने पुसली



**अमळनेर । प्रतिनिधी**

शासनाच्या ग्रामविकास विभागाने १९ जून २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून संगणक परिचालकांची नियुक्ती महाआयटी कडून करून पुन्हा एकदा प्रकल्पात भ्रष्टाचार करणाऱ्या कंपन्यांना काम देण्याचा घाट शासनाने घातला असून ३००० रुपये मानधनवाढ हि १५ व्या वित्त आयोगातून केल्याने संगणकपरिचलकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाकडून झाल्याने हा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करून सर्व संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्यात यावे या मागणीसाठी अन्यायकारक शासन निर्णयाची होळी पंचायत समिती आवारात अम ळनेर ग्राम पंचायत संगणक परीचालकांकडून करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त की,मागील सुमारे १२ वर्षापासून संग्राम व आपले सरकार प्रकल्पाच्या माध्यमातून काम करून राज्यातील सुमारे १२ कोटी जनतेला विविध प्रकारच्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवा देण्याचे काम करणार्याक ग्रामपंचायतच्या संगणकपरिचालकांना यावलकर समितीच्या शिफारशीनुसार ग्राम पंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व किमान वेतन देऊन सामाऊन घेणे या मागणी साठी अनेक वर्षापासून आंदोलांनाच्या माध्यमातून लढा सुरू आहे,अनेक वेळा शासनाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार व ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी लेखी व तोंडी आश्वासन दिले होते,दरम्यान २१ फेब्रुवारी २०२४ चे १६ मार्च २०२४ असे सुमारे २५ दिवस आझद मैदान मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलन केले होते याची दखल घेऊन राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत ३००० रुपये मानधन वाढ करण्याचा निर्णय स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी जाहीर केला होता,परंतु ज्यावेळी १९ जून २०२४ रोजी ग्रामविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केला,त्यात महाराष्ट्र आय टी महामंडळाकडे आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्प चालवण्याची देण्यात आल्याने संगणकपरिचालकांची नियुक्ती ग्रामपंचायत कम चारी म्हणून होणे हे अशक्य होणार आहे,परत संग्राम व आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पात भ्रष्टाचार करणाऱ्या कंपन्यांनाच देऊन संगणक परिचालकांची कायमस्वरूपी पिळवणूक करणार असल्याने व मानधनवाढ ही राज्य शासनाच्या निधीतून न करता ग्रामपंचायतीच्या वित्त आयोगातून केल्याने संगणक परिचालकांचे म ानधन कधीच महिन्याचे महिन्याला होणार नसून या शासन निर्णयामुळे संगणकपरिचालकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे,त्यामुळे ह्या अन्यायकारक शासन निर्णयाची अमळनेर ग्राम पंचायत संगणक परीचालकांकडून होळी करून आंदोलन करण्यात आले.यावेळी संगणक परिचालक संघटना अध्यक्ष अशोक पाटील,महिला तालुकाध्यक्ष राजश्री नेरकर, सचिव प्रभाकर बिरारी,श्याम पाटील,ललिता भदाणे,पल्लवी साळुंखे,नितीन भोई,रुपेश ब्राह्मणकर,महेश कापडे, प्रशांत सुर्यवंशी आदी उपस्थित होते.



## मंगळ कृषी जनजागृती रथयात्रेचा समारोप

**अमळनेर । प्रतिनिधी**

येथील मंगळग्रह सेवा संस्था व तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांनी शेती निविष्ठा खरेदी करताना काय काळजी घ्यावी यासाठी मंगळ कृषी जनजागृती रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील सर्व गावांतील शेतकऱ्यांना म ार्गदर्शन करणाऱ्या या रथयात्रेचा नुकताच समारोप करण्यात आला.

जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक भाऊ जैन आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून १६ मे रोजी जैन हिल्स, जळगाव येथून मंगळ कृषी जनजागृती रथयात्रेचा प्रारंभ झाला होता. तालुक्यातील १५२ गावांम ध्ये या रथयात्रेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी शेती निविष्ठा खरेदी करताना काय काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या रथयात्रेचा नुकताच मंगळग्रह मंदिर परिसरात समारोप करण्यात आला. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी चंद्रशेखर साठे, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत ठाकरे, मंडळ कृषी अधिकारी अविनाश खैरनार, कृषी पर्यवेक्षक अमोल कोठावदे, योगेश खैरनार, योगेश वंजारी, दीपक चौधरी, सुभाष पाटील, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील तसेच मंगल सेवेकरी उपस्थित होते.

# छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन!



## लोहारा विद्यालय

**लोहारा, ता. पाचोरा। वार्ताहर**

येथील डॉ.जे.जी.पंडित म ाध्यमिक विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम विद्यालयाच्या मुख्याध्यापीका सौ. यु. डी. शेळके मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक पी. एम. सुर्वे सर यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विद्यालयाचे पर्यवेक्षक पी. एम. सुर्वे सर यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्या विषयी माहिती दिली. तसेच शिक्षकांमधून पी. यु. खरे सर यांनी शाहू महाराजांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व, शरीर सुदृढ राहावे यासाठी व्यायामाचे महत्त्व तसेच सामाजिक सुधारणा याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. अध्यक्षांनी आपल्या मनोगतातून शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा, कोल्हापूर बांधाऱ्यांची निर्मिती तसेच अनेक समाज उपयोगी केलेल्या सुधारणा याविषयीची माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एन.पाटील सर यांनी केले तर आभार आर. के. सुरवाडे सर यांनी मांनले.

## लाडकूबाई प्रा. विद्यामंदिर

**भडगाव । वार्ताहर**

कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित, लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिर येथे राजश्री छत्रपती शाहू महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात आला. छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना शाळेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.त्या निमि त्ताने शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. परिपाठात श्री सचिन पाटील यांनी राजश्री शाहू महाराज यांचा जीवनपट विद्यार्थ्यांपुढे मांडला व विद्यार्थ्यांनी समाज सुधारकांचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले. संगीत खुर्ची,१०० मी. धावणे या स्पर्धा शाळेत घेण्यात आल्या. संगीत खुर्ची स्पर्धेत पियुष कांतीलाल माळी प्रथम तर समृद्धी महेश जयस्वाल द्वितीय क्रमांक मिळवला. १०० मीटर धावणे स्पर्धेत निलेश भाऊसाहेब वाघ प्रथम तर हेमाक्षी गुणवंत मोरे द्वितीय क्रमांक मिळवला. फलक लेखन श्री अनंत हिरे सर यांनी केले.तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री कमलेश शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. शाळेतील श्रीमती संगीता शेलार,सुनिता देवरे, अनिता सैंदाणे, श्री ज्ञानेश्वर गांगुर्डे, अनंत हिरे,सुयोग पाटील, सचिन पाटील,हरिचंद्र पाटील किरण पाटील शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## आदर्श विद्यालय

**पारोळा । श. प्र.**

येथील न्यू पीपल्स एज्युकेशन सोसायटी संचालित आदर्श विद्यालय व्यंकटेशनगर शाळेत रयतेचा राजा शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक डॉ शांताराम दाजीबा पाटील होते त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील शाहू महाराजांचे योगदान विशद केले.सी



एम पाटील यांनी शाहू महाराजांचा जीवनपट सांगितला. एकनाथ राठोड यांनी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर एस आर पाटील, शैलेश पाटील,उमेश विसावे, हर्षवर्धन सूर्यवंशी, एकनाथ राठोड मनीषा वसावे उपस्थित होते.



## डॉ.व्ही.एम.जैन माध्यमिक विद्यालय

**पारोळा । श. प्र.**

दि.२६ जून रोजी आमच्या विद्यालयात राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली . याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय बडगुजर अध्यक्षस्थानी होते त्यांनी प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली व विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनाबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमात विद्यार्थी मनोगतामध्ये जोगेश्वरी पाटील ,योगराज पाटील, तेजस्विनी पाटील, आदिती सोनार, आदित्य गोस्वामी, पियुशा पाटील, देवेश पाटील, सोहम पाटील आधी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन विश्व जोशी यांनी केले कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## श्री स्वामी समर्थ प्राथमिक शाळा

**पारोळा । श. प्र.**

श्री स्वामी समर्थ प्राथमिक शाळा येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी मुलांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या विषयी माहिती सांगितली. साळुंखे यांनी मुलांना शाहू महाराज यांच्या चरित्राविषयी संपूर्ण म ाहिती मुलांना सांगितली. यावेळी दिपाली चौधरी चेतना चौधरी माधुरी मराठे सुनिता पाटील प्रतीक्षा साळुंखे जयश्री कायस्थ सोनाली टोळकर विकी पाटील, समाधान पाटील सर्व उपस्थित होते,

## डी.आर. कन्या शाळा

**अमळनेर । प्रतिनिधी**

शिक्षणाचे दालन उघडे करणारे शिक्षणाचा प्रचार करणारे श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा व त्यांच्या कार्याची जाणीव करून देण्यासाठी डी. आर .कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा सूर्यवंशी मॅडम यांनी खाशी म ंडळाच्या विश्वस्त सौ .वसुंधरा ताई लांडगे यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले. त्यांनी डी.आर. कन्या शाळेच्या मुलींना छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची कीर्ती व महती समजावून सांगितली या कार्यक्रमाला डी. आर. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा सूर्यवंशी मॅडम, उपमुख्याध्यापक श्री विनोद कदम सर, पर्यवेक्षिका सौ सुरेखा बाविस्कर मॅडम तसेच शिक्षक प्रतिनिधी सौ रत्ना सोनवणे मॅडम उपस्थित होत्या . त्यांनी सुद्धा मुलींना शाहू महाराजांचे धडे गिरवीत शिक्षणाची संधी कशी चालून आली यावर मार्गदर्शन केले.तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू-भगिनी सुद्धा उपस्थित होत्या व कार्यक्रमाची सांगता सौ. प्रेरणा सराफ यांनी त्यांच्या आभार प्रदर्शनांनी केले

# मालदीवचे राष्ट्रपती मुइज्जू यांच्यावर जादूटोणा, सरकारमधील महिला मंत्र्याला अटक



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतासोबत असलेल्या वादामुळे नेहमीच चर्चेत राहणारे मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू यांच्यावर काळी जादू केल्याच्या आरोपाखाली त्यांच्याच सरकारमधील एका महिला मंत्र्याला अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या महिला मंत्र्याचं नाव फातिमा शमनाज अली सलीम आहे. त्या मुइज्जू सरकारमध्ये पर्यावरण मंत्री आहेत.

मुइज्जू यांच्यावर काळी जादू केल्याचा आरोपाखाली फातिमा यांच्यासोबत आणखी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. त्यामधील एक फातिमा या भाऊ आहे. अटकेची कारवाई केल्यानंतर सर्व आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. न्यायालयाने या आरोपींना सात दिवसांची कोठडी सुनावली आहे.

तत्पूर्वी पोलिसांनी फातिमा यांच्या निवासस्थानी टाकलेल्या धाडीमध्ये अनेक आक्षेपार्ह वस्तू सापडल्या होत्या. फातिमा ह्या काळी जादू करण्यासाठी या वस्तूंचा वापर करत होत्या, असा दावा करण्यात येत आहे. राष्ट्रपती मुइज्जू यांची मर्जी संपादन करण्यासाठी फातिमा शमनाज ह्या काळी जादू करत होत्या, असाही दावा करण्यात येत आहे.

मुइज्जू सरकारमध्ये मंत्री असलेल्या फातिमा यांना आणखी चांगलं पद मिळवायचं होतं. दरम्यान, मुइज्जू यांच्या पत्नी आणि मालदीवच्या फर्स्ट लेडी यांनी बदल्याच्या भावनेतून फातिमा शमनाज यांना या प्रकरणात अडकवल्याचाही दावा केला जात आहे.

फातिमा शमनाज यांनी मुइज्जूच्या पत्नीचा एक व्हिडीओ व्हायरल केला होता. त्यात त्या कुठल्यातरी पबमध्ये गाणं गाताना आणि नाचताना दिसत होत्या. त्याचाच वचपा या प्रकरणातून काढण्यात आल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, मुइज्जू सरकारमध्ये पर्यावरण मंत्री बनण्यापूर्वी फातिमा शमनाज ह्या माले सिटी कौन्सिलमध्ये हेनविरू दक्षिणच्या कौन्सिलर होत्या.

एप्रिल महिन्यात मुइज्जू सरकारमध्ये मंत्री बनल्यानंतर त्यांनी कौन्सिलर पदाचा राजीनामा दिला होता. तत्पूर्वी त्या राष्ट्रपतींच्या कार्यालयात मोठ्या हुद्द्यावर काम करत होत्या.

फातिमा ह्या राष्ट्रपती मुइज्जू आणि त्यांच्या पत्नीचे निकटवर्तीय असलेल्या एका मोठ्या अधिकाऱ्याच्या माजी पत्नी आहेत. या दोघांचा हल्लीच घटस्फोट झाला आहे. दरम्यान, यापुढे काय होणार हा तर येणारा काळच सांगणार असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

# अमेरिकेत राज ठाकरेंचं मराठमोळं स्वागत; बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळाच्या संमेलनाला हजेरी

सान होजे । वृत्तसंस्था

अमेरिकेतील सान होजे इथं बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने अधिवेशन घेण्यात येत आहे. या अधिवेशनाला जगभरातील मराठी बांधव एकत्रित येणार आहेत. त्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे हेदेखील कुटुंबासह अमेरिकेत पोहचले. त्याठिकाणी ठाकरे कुटुंबाचं मराठमोळं स्वागत करण्यात आले. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे.

सान होजे येथील मेरियट हॉटेलमध्ये राज ठाकरे, पत्नी शर्मिला ठाकरे, मुलगी उर्वशी, मुलगा अमित, सून मिताली आणि नातू कियान ठाकरे पोहचले. त्यावेळी संमेलनाचे मुख्य संयोजक प्रकाश भालेराव आणि सुजाता भालेराव यांनी राज ठाकरे-शर्मिला ठाकरे यांचे औक्षण करत मराठमोळं स्वागत केले.

तर बृन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष संदीप दीक्षित यांनी मंत्रोच्चाराने त्यांचे स्वागत करताना व्हिडिओत पाहायला मिळते. राज ठाकरेंच्या स्वागतासाठी सगळेच सदस्य खूप उत्सुक होते. त्याचसोबत हॉटेलमधील इतर लोकही मराठमोळ्या पद्धतीचं स्वागत पाहून भारावून गेले.

ॲपल, मेटा आणि गुगलच्या मुख्यालयापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या सान होजे कन्व्हेक्शन सेंटरच्या हॉलमध्ये उत्तर अमेरिकेतल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला गुरुवारपासून सुरूवात होत आहे.

भारताबाहेरच्या या सर्वात मोठ्या संमेलनात मराठी कला, संस्कृती, परंपरा आणइ आणि पुरणपोळीपासून कडक चहापर्यंत खाण्यापिण्याची लयलूट आहे. तब्बल ५० लाख डॉलर्सचं बजेट असलेले हे आजवरचे सर्वात भव्य संमेलन असून यासाठी जगभरातील ६ हजार प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**संमेलनात काय आहे खास?**
सुमारे ३५० स्वयंसेवकांच्या ३० समित्या असून गेल्या २ वर्षापासून अखंडपणे काम सुरू आहे. बे एरिया मराठी मंडळ, ईस्ट बे मराठी मंडळ, कला, स्वरसुधा, नाट्यसरगम, बसंत बहार या स्थानिक संस्थांनी एकत्रित या अधिवेशनाचं संयुक्त आयोजन केले आहे. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मनसे अध्यक्ष राज ठाकरे, माजी क्रिकेटपटू सुनील गावसकर, संगीतकार अजय अतुल यांच्यासह अनेक मान्यवरांचा सहभाग राहणार आहे.

सत्तरच्या दशकात अमेरिकेत येऊन पुढे स्वकर्तृत्वाने सिलिकॉन व्हॅलीवर अधिराज्य गाजवलेल्या प्रकाश भालेराव यांच्यासारख्या ख्यातनाम ज्येष्ठ उद्योजकांपासून पंचविशीतल्या तरूण अभियंत्यांपर्यंत सर्व पिढ्यांमधली मराठी माणसे गेली २ वर्ष या आयोजनासाठी झटत आहेत.



## सुनीता विल्यम्स पृथ्वीवर कधी परतणार?



वॉशिंग्टन । वृत्तसंस्था

सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर तिसऱ्यांदा अवकाशात रवाना झाल्या, पण आता त्यांच्या परतीच्या प्रवासात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. दोनवेळा त्यांच्या स्टारलाइनर अंतराळयानात अडचणी निर्माण झाल्या. दरम्यान, आता याबाबत नासाने मोठी अपडेट दिली आहे. नासाने त्यांच्या परतीची तारीख जाहीर केली आहे. बोइंग स्टारलाइनरमध्ये तांत्रिक बिघाडामुळे अंतराळयान अंतराळात अडकले आहे. सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर यांना घेऊन बोईंगच्या स्टारलाइनरने ५ जून रोजी पृथ्वीवरून उड्डाण केले आणि ६ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर यशस्वीरित्या पोहोचले. तांत्रिक बिघाडामुळे विमान अजूनही स्थानकातच अडकले आहे. नासाने सीआयडी रिटर्न्सचे तीन वेळा शेड्यूल केले होते. नासाने दिली अपडेट स्पेस सेंटरमधून सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर यांच्या परतण्याची तारीख जाहीर केली आहे. नासा क्रू मॅनेजर स्टीव्ह स्टिच यांनी सांगितले की, स्टारलाइनर ४५ दिवसांपर्यंत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर डॉक केले जाऊ शकते.

सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर यांच्या पृथ्वीवर परतण्याची तारीख ६ जुलै निश्चित करण्यात आली आहे. याआधी नासाने पृथ्वीवर उतरण्याची तारीख दोनदा पुढे ढकलली आहे. याआधी १५ जून होती, त्यानंतर २३ जूनलाही तांत्रिक अडचणी आल्या. आणि बोईंगच्या मॅनेजमेंट टीम डेटाचे परीक्षण करत आहे. ६ जून रोजी स्टारलाइनर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर उतरल्यानंतर ५ हेलियम लीक आणि ५ थ्रस्टर्सने काम करणे थांबवले असल्याचे आढळले. या अडचणींवर सध्या काम सुरू आहे.

## मनोज जरांगेंच्या गावात मराठा-ओबीसी भिडले; डीजे वाजविण्यावरून दगडफेक

बीड । वृत्तसंस्था

रामराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या मातोरी (ता. शिरूरकासार) या गावात मराठा आणि ओबीसी यांच्यात राडा झाला. डीजे वाजविण्यावरून दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केल्याने अनेकांची डोके फुटली असून वाहनांचेही नुकसान झाले आहे. ही घटना गुरुवारी रात्री ८ वाजता घडली. रात्री १०:३० वाजेपर्यंत गावात तणावपूर्ण शांतता होती. पोलिसांची कुमक गावात पोहोचली होती. सर्वांना शांतता ठेवण्याचे आवाहन केले जात होते.

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी (जि. जालना) येथे जरी उपोषण केले असले तरी त्यांचे मूळ गाव हे शिरूर तालुक्यातील मातोरी आहे. वडिगोद्री येथे उपोषणास बसलेले प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे गोपीनाथ गडावरून पाडळसिंगीमार्गे भगवानगडावर जाणार होते.

त्यांचे स्वागत करण्यासह त्यांना भगवानगडाकडे नेण्यासाठी मातोरी परिसरातील माळेगाव, पारगाव, तिंतरवणी आदी गावांतील ओबीसी बांधव हे डीजे लावून पाडळशिंगीकडे निघालेले होते. मातोरीत आल्यानंतर डीजेवर काही गाणे वाजवले. यावर मातोरी गावातील काही लोकांनी डीजे बंद करा, गाणे वाजवू नका असे सांगितले.

हे बोलत असतानाच त्यांच्यात शाब्दिक वाद झाले. त्यानंतर याचे रूपांतर दगडफेकीत झाले. यामध्ये दोन्ही गटांचे लोक जखमी झाले आहेत. तसेच गाणे वाजवलेला डीजे आणि काही दुचाकींचीही तोडफोड करण्यात आली आहे.

## २० वर्षांपासून पगार चालू, काम मात्र काहीच नाही!

### पण ती म्हणते बिनकामाचा पगार नको!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

काम नाही पण पगार मात्र सुरू हे जिच्या बाबतीत घडलं तिचं नाव आहे लॉरेन्स व्हान व्यासेनहोव्ह. ती फ्रान्समधील रहिवासी आहे. ती अपंग आहे. फ्रान्समधील मुख्य टेलिकॉम कंपन्यांपैकी जायंट ऑरेंज ही महत्त्वाची कंपनी आहे. या कंपनीत लॉरेन्स काम करते. तिचा तिथे वर्णभेद व इतर कारणांवरून छळ करण्यात आला, असा आरोप तिने कंपनीवर ठेवला आहे. १९९३ मध्ये फ्रान्स टेलिकॉमने लॉरेन्सला नोकरीवर घेतले होते. त्याचदरम्यान ऑरेंज कंपनीने ती कंपनी ओव्हरटेक केली. फ्रान्स टेलिकॉमला लॉरेन्सच्या आरोग्याची पूर्वकल्पना होती. लॉरेन्सच्या शरीराच्या एका भागाला पक्षाघात झाला होता. शिवाय इतरही लहानमोठ्या आजारांनी लॉरेन्स त्रस्त होती. लॉरेन्स ही कंपनीत सेक्रेटरी म्हणून काम करत होती. २००२ पर्यंत ती कंपनीत मानव संसाधन विभागात कार्यरत होती. ऑरेंज कंपनीने तिचे म्हणणे अजिबात विचारात घेतले नाही. महत्त्वाचं म्हणजे कंपनी लॉरेन्सला काम देत नव्हती, पण तिला पगार मात्र नियमित देत होती. वास्तविक बदली झाल्यानंतर लॉरेन्सच्या कामाचं ठिकाण आणि स्वरूप बदललेलं होतं पण त्याला अनुसरून लॉरेन्सच्या कामात मात्र काहीच बदल केले गेले नाहीत. बदललेल्या कामाची ऑर्डरदेखील तिला दिली गेली नाही. हा सर्व प्रकार म्हणजे कामावरून काढून न टाकता कर्मचाऱ्याचा मानसिक छळ करण्याचा प्रकार आहे, असं



लॉरेन्सचं ठाम मत होतं. त्याविरुद्ध गेल्या काही वर्षांपासून ती आवाज उठवते आहे, पण त्यात तिला अजूनही यश आलेलं नाही. काम नाही आणि पगार मात्र नियमित ! तब्बल वीस वर्षे हा प्रकार सुरू असल्यानं इतरांना लॉरेन्सची ऐश सुरू आहे असं वाटत होतं, पण ही ऐश नसून केवळ जाच आहे हे फक्त लॉरेन्सलाच समजत होतं. तिला पगार मिळत होता पण काम दिलं जात नव्हतं. आणि तरीही ती नीट काम करत नाहीये अशा वरिष्ठांच्या नोटिसा अन् मेमो तिच्या नावावर निघत होते. त्यालाही तिला उत्तरे द्यावी लागत होती. तिने तिच्या वरिष्ठांकडे अन् सरकारकडे याबाबत लेखी तक्रार केली. त्यानंतर ऑरेंज कंपनीने तडजोड घडवून आणण्यासाठी एका मध्यस्थाची नेमणूक केली. पण त्यानंतरही परिस्थितीत काहीच सुधारणा झाली नाही. या परिस्थितीमुळे तिला नैराश्याचा त्रास होऊ लागला. त्यासाठी थेरपी, गोळ्या-औषधं आणि उपचार सुरू झाले. लॉरेन्स आजारपणाच्या सुटीवर मन परतून कामावर रुजू व्हायची तेव्हा तिला हवे असलेले बदल कामात आणि कामाच्या ठिकाणी करून दिले जायचे असे कंपनीचे म्हणणे होते. सुरुवातीला ऑरेंज कंपनीने तिला शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा देऊन नियुक्ती केली होती. त्यानंतर तिची शारीरिक स्थिती बघून तिला कंपनीत सचिवपद आणि सोयीसुविधा देऊ केल्या होत्या असेही स्पष्टीकरण कंपनीने दिले. पण कंपनी आपल्याला काम न देता पगार आणि मेमो देऊन छळ करते आहे, असा लॉरेन्सचा आरोप कायम आहे.

## नीटबद्दल राहुल गांधींनी मुद्दा उपस्थित करताच अध्यक्ष म्हणाले; पूर्ण वेळ घ्या, सविस्तर बोला, पण...



मुंबई । वृत्तसंस्था

सध्या देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षेच्या मुद्द्यावरून आज संसदेच्या दोन्ही सभागृहात जोरदार गदारोळ झाला. लोकसभा आणि राज्यसभेमध्ये नीटच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांच्या खासदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात झाल्यावर नीटचा प्रश्न उपस्थित केला. राहुल गांधी यांनी सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी नीटच्या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी केली.

त्यावर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चेदरम्यान, तुम्ही प्रत्येक विषयावर बोलू शकता, असे सांगितले. राहुल गांधी यांनी यावेळी अध्यक्षांकडे दोन मिनिटांचा वेळ मागितला होता, तेव्हा लोकसभा अध्यक्षांनी दोन मिनिटे कशाला, तुमच्या पक्षाचा जेवढा वेळ आहे तेवढा वेळ घ्या, सविस्तर बोला. मात्र तुम्ही विरोधी पक्ष नेते आहात. त्यामुळे संसदीय मर्यादांचं पालन करा, असे राहुल गांधी यांना सांगितले. आज लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यावर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहातील १३ माजी सदस्यांच्या निधनाची माहिती सभागृहाला देऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी सदस्यांना त्यांच्यासमोर असलेली कागदपत्रे पटलावर ठेवण्यास सांगितले. त्याचवेळी राहुल गांधी यांनी नीटचा मुद्दा उपस्थित करून त्यावर चर्चा करण्याची मागणी केली. राहुल गांधींच्या मागणीला उत्तर देताना लोकसभेच्या अध्यक्षांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर तुम्ही कुठल्याही मुद्द्यावर सविस्तर बोलू शकता.

## कडक उन्हामुळे अब्राहम लिंकन यांचा पुतळाही वितळला; अमेरिकेत उष्णतेचा प्रकोप; तापमान ४५ अंशांवर पोहोचले

न्यूयॉर्क । वृत्तसंस्था

सध्या भारतासह जगभरात उष्णतेच्या लाटा येत असून, यामुळे आतापर्यंत शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्यातच आता वाढत्या उष्णतेमुळे पुतळेही वितळत असल्याचे समोर आले आहे. कडक उन्हामुळे वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांचा सहा फूट उंच मेणाचा पुतळा वितळला आहे. अगदी काही वेळातच मूर्तीचे डोके वितळले आणि बाजूला पडले. लिंकन मेमोरिअलच्या धर्तीवर बांधण्यात आलेल्या या पुतळ्याचे डोके काढून टाकण्यात आले आणि पायही डोक्यापासून वेगळा करण्यात आला आहे. बुधवारपर्यंत दुसरा पायही उन्हामुळे वितळला आहे.



**मूर्तीचे मोठे नुकसान**

कल्चरल डीसी या पुतळ्याची निर्मिती करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने सांगितले की, आमच्या कर्मचाऱ्यांनी लिंकन यांच्या पुतळ्यातील त्यांचे डोके पडू नये किंवा तुटू नये म्हणून बाजूला काढून ठेवले. तीन हजार पौंडांचा हा मेणाचा पुतळा मेणबत्तीप्रमाणे पेटवला जाणार आहे आणि कालांतराने त्यात बदल केला जाईल; परंतु अत्यंत उष्णतेमुळे या मूर्तीचे बरेच नुकसान झाले आहे.

**तापमानाचा विक्रम मोडला**

अमेरिकेतील अनेक भागांत तापमानाचा विक्रम मोडीत निघाला आहे. अनेक भागांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअस आहे. हवामान खात्याने मध्य आणि पूर्वेकडील भागांत राहणाऱ्या लोकांना या महिन्यातील तीव्र उष्णतेपासून सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

**कुठे बसवला होता पुतळा?**

संस्थेने सांगितले की, लिंकन यांच्या पुतळ्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या मेणाचा गोठणबिंदू १४० अंश फॅरेनहाइट आहे. ४० एकर : कॅम्प बार्कर नावाचा हा पुतळा सप्टेंबरपर्यंत शाळेत ठेवण्यात येणार होता. हा पुतळा गृहयुद्धातील निर्वासितांच्या इतिहासावर आधारित होती. निर्वासित शिबिरामध्ये पूर्वी गुलाम बनवलेले आणि मुक्त केलेले आफ्रिकन अमेरिकन राहत होते. गॅरिसन एलिमेंटरी आता जिथे उभी आहे त्या जागेवर कॅम्प बार्करची स्थापना करण्यात आली. अब्राहम लिंकन हे अमेरिकेचे १६वे राष्ट्राध्यक्ष होते. अमेरिकेतील गुलामगिरी संपवण्याचे श्रेय लिंकन यांना दिले जाते.

## मुलगी लढली अन् कमाल केली




नागपूर । वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या दुष्काग्रस्त विदर्भातील भंडारा जिल्ह्यात एका छोट्या वस्तीत राहणाऱ्या रमाबाईनं मला १० वीची परीक्षा द्यायचीय असं तिने घरच्यांना सांगितले. कुटुंबाची परिस्थिती हालाखीची होती, १० वीच्या शिक्षणासाठी पुस्तके खरेदी करता येतील इतकेही पैसे नव्हते. वर्गात जे काही शिकेल ते केवळ आठवणीत ठेवणे यावरच रमाबाईला अवलंबून राहावं लागायचे. परीक्षेची तारीख जवळ आली, तेव्हा रमाबाईच्या मनात भीती होती. जे शिक्षण तिने कुठलंही पुस्तकं न वाचता घेतले आहे त्याच्या भरवशावर १० वीची परीक्षा कशी द्यायची? तिच्या या भीतीला एका शिक्षकाने दूर करत तिला हिंमत दिली. जर तुला तुझ्या समाजासाठी खरेच काही करायचे असेल तर न भीता परीक्षा दे, ही परीक्षा केवळ १० वीची नाही तर तुझं आयुष्य बदलणारी परीक्षा आहे असं शिक्षकाने रमाबाईला सांगितले. रमाबाईनं परीक्षा दिली आणि जेव्हा निकाल आला तेव्हा तिच्या चेहऱ्यावर समाधान होतं. रमाबाई तिच्या आदिवासी समुदायात १० वीची परीक्षा पास होणारी पहिलीच मुलगी होती. रमाबाईचं हे यश तिच्या संपूर्ण समाजासाठी एक प्रेरणा आहे. रमाबाई ही नाथजोगी समाजातून येते जे दारोदार भीक मागून त्यांचे आयुष्य जगतात. हे लोक अत्यंत गरीब असतात, २ वेळच्या जेवणासाठी या लोकांना संघर्ष करावा लागतो. दुसऱ्यांकडे काम करण्यासाठी कुठलेही शिक्षण नाही. त्यामुळेच हे लोक पूर्णपणे इतरांनी दिलेल्या भीकेवर त्यांचे जीवन जगत असतात.

**पवित्र कुरआन - सुराह ३१, आयात ६**

आणि माणसापैकी कोणी असाही आहे की मनमोहक कथा खरेदी करून आणतो, जेणेकरून लोकांना अल्लाहच्या मार्गापासून ज्ञानाविना भटकवावे आणि या मार्गाचे आवाहन चेष्टेत उडवावे. अशा लोकांसाठी भयंकर अपमानजनक शिक्षा आहे.

**सुराह ४३, आयात ३७**

हे शैतान असल्या लोकांना सरळ मार्गावर येण्यापासून रोखतात, आणि ते आपल्या जागी असे समजतात की आम्ही नीट चाललो आहोत.

**जे.के.पार्क परिवार, नंदुरबार**

**मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२**





DECLARATION

Here by I declare the my Old Name **NARESHKUMAR JETHMAL GULECHHA** has been changed to New Name **NARESH JETHAMAL JAIN** so onwards all official must be done, by my new name only.

**NARESH JETHAMAL JAIN**

Main Road, Akkalkuwa, Nandurbar



## थोडक्यात

### सुजालपूर शिवारातून ११ हजारांची मोटर चोरी

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

तालुक्यातील सुजालपूर शिवारातील शेत सर्वे गट नं. १७५/१ मधील विहिरीतून १० हजार ७५० रुपये किमतीची पाण्याची मोटर व केबल चोरुन नेल्याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२६ जून रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास रोजी सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान तालुक्यातील सुजालपूर शिवारात प्रविण अशोक पाटील यांच्या शेतातून ८ हजार रुपये किमतीची ३ एचपी पाण्याची मोटार, २ हजार ७५० रुपये किमतीची ५० फुट केबल वायर असा एकूण १० हजार ७५० रुपये किंमतीची पाण्याची मोटार व केबल वायर अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली. याबाबत तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोना सरवरसिंग वसावे करीत आहेत.

### गोगापूर शिवारातून २० हजारांची सोलर कीट चोरी

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

शहादा तालुक्यातील गोगापूर शिवारातून २० हजार रुपये किमतीची सोलर पॉवर किट अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुचीका रविंद्र पाटील यांच्या शहादा तालुक्यातील गोगापूर शिवारातील सर्व्हे नंबर १८४/२ मध्ये दि.१७ ते १८ मे दरम्यान अज्ञात चोरटयांनी १० हजार रुपये किमतीची सोलर पॉवर किट चोरुन नेली. याबाबत शहादा पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोना जितेंद्र ईशी करीत आहेत.

### अंठीपाडा येथून अल्पवयीन मुलीला पळविले

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

अंठीपाडा (ता.नवापूर) गावातून अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दि.१९ जून रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास अंठीपाडा ता.नवापूर येथून १५ वर्ष १ महिना १३ दिवस वयाच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले. याबाबत मुलीच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विसरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार विजय चौधरी करीत आहेत.

### पेरणीच्या कारणावरुन चौघांची एकास मारहाण

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

शेतात पेरणी करण्याच्या कारणावरुन चौघांनी एकास मारहाण करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मांडवी ता.धडगाव येथील चौघांविरुद्ध धडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२६ जून २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास आमच्या शेतात पेरणी का करत आहात या कारणावरुन मिऱ्या डुंग्या वळवी, सायसिंग मिऱ्या वळवी, जयसिंग मिऱ्या वळवी, सुभाष डुंग्या वळवी (सर्व रा. मांडवी खु.ता.धडगाव) यांनी शिवराम शिवण्या बावा वळवी यांना हाताबुक्यांनी मारहाण केली. तसेच आरडाओरड केली असता त्यांना वाचविण्यासाठी आलेले साक्षीदार किसन राहसे याच्या डोक्यावर मारुन दुखापती केले व हाताबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. याबाबत धडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार स्वप्निल गोसावी करीत आहेत.

### अँग्लो उर्दू शाळेतील भरती पारदर्शक व्हावी - मागणी

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

येथील नॅशनल अँग्लो उर्दू हायस्कूल व जुनिअर कॉलेज मधील भरती जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी यांच्या नेमणुकीद्वारे पारदर्शक व सीसीटीव्ही सर्वेक्षण क्षेत्राखाली करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी हरिष भामरे यांना देण्यात आले.

यावेळी हाजी अब्दुल गफ्फार अब्दुल रहेमान पिंजारी, जाकीरमियाँ मुसामियाँ जहागिरदार, शेख मजहरोद्दीन, कमरअली सैय्यद साहब, लियाकत बागवान, रशिद मिर्झा, शकिल मन्सुरी, अस्लम चौधरी, रफिक शहा आदी उपस्थित होते.

# भांग्रापाणी येथे रोखला बालविवाह

## ग्रामविकास अधिकारी यांचा पुढाकार, बालविवाहाबाबत दोन्ही कुटुंबांचे केले समुपदेशन

■ **मोलगी । वार्ताहर**

धडगाव तालुक्यातील भांग्रापाणी येथे होणारा बालविवाह ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे रोखण्यात ग्रामपंचायत प्रशासनाला यश आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुलाचे वय २१ वर्ष तसेच मुलीचे वय १८ वर्ष पुर्ण झाल्याशिवाय त्यांचे लग्न करु नये असा कायदा आहे. याबाबत शासन स्तरावरुन वारंवार जनजागृती करण्यात येते. मात्र, तरीही काही पालक कायदा धाब्यावर बसवून कायद्याची पायमल्ली करुन अल्पवयीन मुलामुलींचे विवाह जुळविण्यात धन्यता मानतात. अशाच एका घटनेत वराला बोहल्यावर चढण्यापुर्वीच रोखण्यात यश आले. अक्कलकुवा तालुक्यातील सातपुडा पर्वतरांजीतील अतिदुर्गम भागातील भांग्रापाणी ग्रामपंचायत अंतर्गत बिज्यामालपाडा येथे निर्दशनास आली. अल्पवयीन मुलांचा लग्नाचा घाट घातला जात असल्याची माहिती भांग्रापाणी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी नरोत्तम बिऱ्हाडे यांना मिळाली.



माहिती मिळाल्याबरोबर त्यांनी सरपंच सोन्या टेंबऱ्या वसावे , भांग्रापाणीचे पोलिस पाटील विनोद बाल्या वसावे, उपसरपंच रामसिंग दोहऱ्या वसावे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी रुपसिंग वसावे यांना या घटनेची माहिती देऊन सत्वर विवाहस्थळी जाऊन त्यांच्या वयाचे पुरावे मागितले. कागदपत्रांची पाहणी केली असता त्यात तफावत आढळून आल्याने विवाह थांबविण्याची सुचना केली. मोबाईलवरच वराच्या वयाचे पुरावे मागितले असता वर देखील अल्पवयीन असल्याने विवाह होणार नसल्याचे त्यांनी कळविले. तोपर्यंत वरयात्रा धडगाव तालुक्यातुन भांग्रापाणी येथे यायला निघाली होती. परंतू ग्रामपंचायत प्रशासनाने वरयात्रा अर्ध्या रस्त्यातुनच परत पाठवली. प्रसंगी मुलीच्या पालकांचे समुपदेशन करण्यात येऊन त्यांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याची जाणीव करुन दिली. तसेच कमी वयात मुलीचे लग्न केल्यास कुपोषण, माता मृत्यू, अर्भक मृत्यू यासारख्या आरोग्यविषयक गंभीर समस्यांना मुलींना भविष्यात तोंड द्यावे लागते.

याबाबत सरपंच सोन्या टेंबऱ्या वसावे आणि ग्रामविकास अधिकारी नरोत्तम बिऱ्हाडे यांनी पालकांमध्ये जागृती करुन त्यांना समज दिली. त्यामुळे पालकांनी देखील विवाह थांबवला.

ग्राम विकास अधिकारी नरोत्तम बिऱ्हाडे यांचे प्रसंगावधान व समयसुचकतेमुळे दोन अल्पवयीन मुलांचा विवाह थांबविण्यात ग्रामपंचायत प्रशासनाला यश आले. ग्राम विकास अधिकारी नरोत्तम बिऱ्हाडे व सरपंच सोन्या वसावे यांच्या संयुक्त स्वाक्षरीने सक्त ताकीद देणारे पत्र संबंधित पालकांना देण्यात आले. ग्रामपंचायतीत जन्म मृत्यु व विवाह नोंदणी निबंधक असलेले अधिकारी व सरपंच यांनी वेळीच अल्पवयीन मुलांचा विवाह रोखल्याने सर्वच स्तरावरुन त्यांचे कौतूक होत आहे. विशेष म्हणजे या घटनेत पोलिसांची कोणतीही मदत घेण्यात आली नाही. पोलीस हस्तक्षेप व मदती शिवाय समुपदेशन व सामोपचाराने विवाह रोखल्याची जिल्ह्यातील पहिलीच घटना आहे.

## भावी पोलिसांसाठी लायन्स क्लबतर्फे अन्न सेवा

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

येथे पोलीस भरतीसाठी राज्यातील विविध जिल्ह्यातील विद्यार्थी शहरात आले आहे, त्यांची जेवणाबाबत गैरसोय होवू नये म्हणून जेथे कमी तेथे आम्ही या ब्रीद वाक्यानुसार लायन्स क्लब रोज संध्याकाळी अंदाजे २०० विद्यार्थ्यांना पोटभर गरम मसाला खिचडी वाटप करत आहे. आज याप्रसंगी नवनियुक्त झोन चेअरमन शेखर कोतवाल, नूतन अध्यक्ष शंकर रंगलानी, सचिव दिनेश वाडेकर, कोषाध्यक्ष मनोज पोखरना, प्रोजेक्ट चेअरमन सतीश चौधरी आदी उपस्थित होते. या प्रोजेक्ट मुळे क्लबचे नाव विविध जिल्ह्यात जाणार आहे व भावी पोलिसांच्या मनात क्लब इमेज अधिक वाढणार आहे. भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत या विद्यार्थ्यांना जेवणाची सोय करण्याचा क्लबचा विचार आहे.




# माजी खा.डॉ.हीना गावित यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

## मॅरेथॉन स्पर्धेत ३०० स्पर्धकांचा सहभाग, ८० किलो केक ठरला आकर्षण

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

येथील माजी खा.डॉ.हीना गावित यांचा वाढदिवस आज विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. एका कार्यकर्त्याने आणलेला ८० किलो वजनाचा केक कापण्यात येवून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. दिवसभर माजी खा.डॉ.हीना गावित यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला. दरम्यान, मा.खा. डॉ.हिना विजयकुमार गावित वाढदिवस आयोजन समिती व्दारा खुल्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

आज दि.२८ जून रोजी माजी खा.डॉ.हीना गावित यांचा वाढदिवस उत्साहात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यांच्या निवासस्थानी सकाळपासून अनेक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर आदीनी प्रत्यक्ष येवून तसेच दुरध्वनी, सोशल मीडियावर त्यांचे अभीष्टचिंतन केले. एका कार्यकर्त्यांने डॉ.गावित यांच्या वाढदिवसानिमित्त ८० किलो वजनाचा केक आणला होता. हा केक कापण्यात येवून उपस्थितांना वाटण्यात आला. यावेळी डॉ.गावित यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

दरम्यान, सकाळी ७ वाजता डॉ.हीना गावित यांच्या निवासस्थानापासून मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या मॅरेथॉन स्पर्धेसाठी शहरातील विविध शाळांचे व महाविद्यालयांच्या अंदाजे ३०० मुला मुलींनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत विविध गटातून तीन बक्षिस देण्यात आले. प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये रोख, द्वितीय क्रमांकाला तीन हजार व तृतीय क्रमांकाला २ हजाराचे रोख पारीतोषिक, स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले. विजेत्यांचा गौरव माजी जि.प.अध्यक्षा डॉ. कुमुदिनी गावित, डॉ.हीना गावित, जि.प. अध्यक्षा डॉ.सुप्रिया गावित, भाजपा महिला अध्यक्षा श्रीमती सविता जयस्वाल व तालुका भाजपा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.





**माजी खा.डॉ.हीना गावित यांच्या वाढदिवसानिमित्ताने कार्यकर्त्यांने आणलेला ८० किलो केक कापतांना डॉ. हीना गावित, समवेत माजी जि.प.अध्यक्षा डॉ.कुमुदिनी गावित, जि.प.अध्यक्षा डॉ.सुप्रिया गावित, प्रवीण शिरसाठ, संजय पाटील, सविता जयस्वाल आदी. दुसऱ्या छायाचित्रात मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना पारितोषिक वितरण करतांना माजी खा.डॉ.हीना गावित, प्रा.ईश्वर धामणे, बळवंत निकुंभ, निलेश गावित, सविता जयस्वाल आदी.**

**विजेते स्पर्धक असे**

६ वी ते १० वी मुले ५ कि.मी. धावणे. - राहुल आंबऱ्या वसावे- (अनु. आश्रमशाळा, वरसुस- प्रथम), सम्राट साहेबसिंग राजपूत (डी.आर. हायस्कुल,नंदुरबार- व्दितीय), ओम अशोक धनगर (डी.आर.हायस्कुल, नंदुरबार,तृतीय). ६ वी ते १० वी मुली ५ कि.मी. धावणे. गट-बालीका बन्सीलाल वसावे (मिशन हायस्कुल, नंदुरबार प्रथम), खुशी रवि चव्हाण (हि.गो. श्रॉफ हायस्कुल, नंदुरबार, व्दितीय), साक्षी गणेश फडतरे (डॉ.काणे गर्ल्स हायस्कुल,नंदुरबार तृतीय). इ. ११ वी ते सिनीयर कॉलेज मोठा गट पुरुष- खुमानसिंग ठाकरे (एनटीव्हीएस फार्मसी कॉलेज, नंदुरबार-प्रथम), पिंट्या दित्या वसावे (जी.टी.पी. कॉलेज, नंदुरबार- व्दितीय), महेंद्र सामा वळवी (जिजामाता कॉलेज, नंदुरबार तृतीय). इ.११ वी ते सिनीयर कॉलेज, मोठा गट महिला ६ कि.मी.गट-आरती पावरा (अभय कॉलेज, धुळे- प्रथम), निकीता दिलिप बैसाणे (जी.टी.पी. कॉलेज, नंदुरबार व्दितीय), ममता शंकर गवळी- (डॉ. काणे गर्ल्स हायस्कुल, नंदुरबार तृतीय)

मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी आयोजनासाठी जिल्हा आरोग्य विभागाचे पोलिस अधिकारी तसेच विविध विद्यालयांचे क्रीडा शिक्षक प्रा.दुर्योधन राठोड, राजेश शाह, राज जयकर, रविंद्र सोनवणे, जितेंद्र पगारे, महेश भट, पंकज चौधरी, शिवाजी पाटील, प्रमोद खर्डे, जगदीश वंजारी, मनिष सनेर, निलेश गावित, बंसीलाल वसावे, श्री.बच्छाव, सागर तांबोळी, सागर धामणे यांनी सहकार्य केले.

## शहादा तालुक्यातील शिक्षकांची वैद्यकीय व इतर बिले मंजूर

■ **शहादा । ता.प्र.-**

अखिल शहादा तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी राघवेंद्र घोरपडे यांना तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचा विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात निवेदन देऊन चर्चा केली. त्यात शहादा तालुक्यातील शिक्षकांची वैद्यकीय व इतर बिले मंजूर करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

अखिल शहादा तालुका प्राथमिक शिक्षक संघाची तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर गटविकास अधिकारी राघवेंद्र घोरपडे, गटशिक्षणाधिकारी डॉ.योगेश सावळे यांना शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत निवेदन देवून त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यात एकस्तरबाबत शिक्षकांना लाभ मिळावा यासाठी एकस्तर बाबत लवकरच तालुक्याला कॅम्प लावून प्रत्येकी दोन-दोन केंद्राला बोलावून येत्या पंधरा दिवसात कार्यवाही करू असे आश्वासन देण्यात आले. तसेच वैद्यकीय बिल त्वरित मिळावे याविषयी प्रश्न उपस्थित केल्यानंतर श्री.घोरपडे यांनी सांगितले की, जवळ जवळ तालुक्यातील सर्वच बिले मंजूर झालेले असून संबंधित शिक्षकांच्या खात्यावर आज वर्ग करण्यात आलेले आहेत. काही राहिले असल्यास लवकरात लवकर त्याचासुद्धा पाठपुरावा करू असे सांगण्यात आले.

गटविम्याची जी रक्कम आहे त्यासाठी निधी नसल्या कारणाने बाकी आहे. सदर प्रस्ताव जिल्हा परिषद येथे पाठवण्यात आला आहे. संबंधित सेवानिवृत्त शिक्षकांच्या खात्यावर लवकरच परस्पर जमा होईल असे सांगण्यात आले. सेवापुस्तकबाबत जे शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे सेवापुस्तक पूर्ण झालेले असून राहिलेले हळूहळू सर्व सेवा पुस्तके अद्यावत करणार आदींसह विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेस तालुका नेते महेंद्र चौधरी, तालुका अध्यक्ष संजय मोरे, सरचिटणीस रविंद्र बैसाणे, छोटूलाल पाटील आदी उपस्थित होते.

दरम्यान, शिक्षकांची वैद्यकीय बिले मंजूर करण्यात आल्याने संबंधीत शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## जीटीपी महाविद्यालयात अंमली पदार्थविरोधी प्रतिज्ञा

■ **नंदुरबार । दि.२८। प्रतिनिधी**

नार्कोटिक कंट्रो ब्युरो गृह मंत्रालय भारत सरकार व एटीएस विभाग नाशिक व जी.टी.पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या संयुक्त विद्यमाने अंमली पदार्थ विषयक व्यसनांना आळा घालण्याच्या संदर्भाने सर्व घटकांमध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी प्रतिज्ञा घेण्यात आली.




यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एम.जे.रघुवंशी यांनी युवकांना अंमली पदार्थापासून दूर राहण्याचे सांगितले. एक सशक्त युवा सशक्त भारत निर्माण करू शकतो. म्हणून आपल्यासारख्या सर्व युवकांनी एक चांगले निरोगी जीवन जगावे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास संस्थेचे समन्वयक डॉ.एम.एस. रघुवंशी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस.यु. पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य टी.जी. पाटील, एटीएस विभागाचे नाईक प्रितेश चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अंमली पदार्थापासून दूर राहण्यासंदर्भाची प्रतिज्ञा कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज शेवाळे यांनी दिली.

## बोरद ग्रामपंचायतीचा ९२ वा वर्धापन दिन साजरा

■ **बोरद । वार्ताहर -**

येथील ग्रामपंचायतीने ९२ व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. त्यानिमित्ताने बोरद ग्रामपंचायतीच्या स्वर्गीय सरपंचांना अभिवादन करत हा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

ब्रिटिश काळापासून अस्तित्वात असलेल्या अर्थात १९३३ पासून स्थापन झालेल्या बोरद ग्रामपंचायतीने आज ९२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने ग्रामपंचायतीचा वर्धापन दिन आयोजित करण्यात आला. या वर्धापन दिनाला आतापर्यंत झालेल्या सर्व सरपंच जे स्वर्गीय झाले आहेत अशांना ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य तसेच गावकऱ्यांनी एकत्र येत त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले आणि त्यांनी बोरद गावाला दिलेली दिशा तसेच बोरद गावाचा केलेला विकास याची प्रेरणा घेत पुढेही ग्रामपंचायतीची वाटचाल विकासाच्या दिशेनेच राहील अशी आशाही व्यक्त केली.

१९३३ पासून स्थापित झालेल्या या ग्रामपंचायतीला आतापर्यंत बोरद ग्रामपंचायतीचे संस्थापक अध्यक्ष स्व.गोविंद रघु पाटील यांच्यासह ग्रामपंचायत स्थापनेपासून सरपंच राहिलेले स्व.श्रीराम गोविंद पाटील, स्व, सूपडू सदाशिव पाटील, स्व. देविदास चतुर चौधरी, स्व.भीमसिंह बहादुरसिंग गिरासे, स्व.चिनू भिवसन ठाकरे, स्व. बाबूलाल रुमाल पवार, स्व.भिमसिंग झाल्या ठाकरे आदींनी बोरद ग्रामपंचायत स्थापनेपासून विविध कीर्तीमान स्थापन केले. अतिशय चांगल्या पद्धतीने ग्रामपंचायतीचा कार्यकाळ गावाच्या विकासासाठी सार्थक केला. अशा महाविभूतींच्या स्मृतीस आज सर्वांनी एकत्र येत त्यांच्या प्रतिमेचे पूजन करत अभिवादन केले.

यावेळी तळोदा पंचायत समितीचे उपसभापती विजय राणा, सरपंच अनिता भिलाव, उपसरपंच निलिमा जाधव, माजी जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती नरहर ठाकरे, माजी सरपंच, सुकलाल ठाकरे, सुरेश पवार, ग्रामपंचायत सदस्य वासंती ठाकरे, लताबाई पवार, ज्योतिबाई साळवे, निलुबाई ठाकरे, लक्ष्मण साळवे, अनिल राजपूत, जुल्फेकार तेली, माजी ग्रामपंचायत सदस्य मंगेश पाटील, विठ्ठल ढोडरे, दयानंद चव्हाण, रवींद्र भिलाव, कुणाल पाडवी, बाबूलाल चित्ते, वृंदावन ठाकरे, नितीन राणा, भावराव बिरारे यांच्यासह स्वर्गीय सरपंचांचे कुटुंबिय उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रामविकास अधिकारी विजय पाटील यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत कर्मचारी बबलू राजपूत, निलेश राजपूत, मंगलसिंग राजपूत, रवींद्र ठाकरे, संजय भिलाव आदी सर्व कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी परिश्रम घेतले.

## शॉर्ट न्यूज

### आरोग्य केंद्रात योग दिन साजरा



■ धुळे । प्रतिनिधी

महापालिका आरोग्य विभागातंर्गत नंदी रोडवरील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.एम.आर. शेख यांनी योगाचे महत्व पटवून दिले. विजय जाधव यांनी उपस्थितांना योग आणि प्राणायाम शिकवले. तसेच त्याचे महत्व पटवून दिले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत मराठे, डॉ.योगेश पाटील व कर्मचारी उपस्थित होते.

### पाटील महाविद्यालयात अभिवादन



■ पिंपळनेर । वार्ताहर

दहिवेल येथील उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय तसेच दादासाहेब माणिकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.डॉ.सुरेश अहिरे हे होते. तर कनिष्ठ महाविद्यालयाचे इन्चार्ज प्रा. जे.सी. अहिरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रथम छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक रासेयोचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.शिवप्रसाद शेवाळे यांनी केले. अध्यक्ष भाषणात प्राचार्य डॉ. अहिरे यांनी शाहू महाराजांच्या जीवना चरित्रावर प्रकाश टाकला. आभार कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा.जिजाबाई गायकवाड यांनी मानले. यावेळी प्रा.डॉ.एस.बी.देसले, प्रा.निलेश खैरनार, प्रा.त्र्यंबक भामरे, प्रा.डी. एम.पाटील, प्रा. संजय बागुल, प्रा. गणेश बच्छाव, पी.एच.जाधव, प्रा.मंगेश भामरे, श्रीमती सोनवणे, प्रल्हाद महाजन, नंदकुमार भामरे उपस्थित होते.

### क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशासाठी आवाहन

■ धुळे । प्रतिनिधी

राज्यातून प्रतिभावान खेळाडूची निवड करुन त्यांना संतुलित आहार व अद्यावत क्रीडा सुविधा पुरवणे, सुसंघटीत करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्यासाठी क्रीडा युवक सेवा संचालनालय शिव छत्रपती क्रीडापीठ म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधनी कार्यरत आहे. या ९ क्रीडा प्रबोधणी मध्ये सन २०२४-२०२५ करिता निवासी व अनिवासी खेळाडू करिता ५० टक्के सरळसेवा, ५० टक्के कौशल्य चाचणीच्या आधारे प्रवेश देण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे यांनी दिली आहे.क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासंदर्भात शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, खेळाडू यांनी विहीत नमून्यात आवश्यक कागदपत्रे जोडून ५ जुलैपर्यंत जिल्हास्तरावर नाव नोंदणी करावी.

### प्रा. सूरज चौधरी यांना पीएच.डी



■ शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च महाविद्यालयातील प्रा. सूरज राजेंद्र चौधरी यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. सूरज चौधरी हे आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर येथे फर्मास्यूटिकल केमिस्ट्री विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना ७ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असून त्यांपैकी ६ वर्षांपेक्षा जास्त संशोधनाचा अनुभव आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये २० हून अधिक शोधनिबंध सादर केले आहेत.

# बोराडी ग्रा.पं.च्या गोवर्धन गॅस प्रकल्पाचे उद्घाटन

## जि.प.चे सीईओ विशाल नलवाडे यांच्या हस्ते १० जणांना गॅस कनेक्शन

■ बोराडी । वार्ताहर

बोराडी ग्राम परिषदेतर्फे गोवर्धन गॅस प्रकल्पाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नलवाडे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच आतापर्यंत गोवर्धन गॅस प्रकल्पद्वारे दहा घरांना गॅस कनेक्शन देण्यात आले आहे.

याप्रसंगी जि.प.चे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, जि.प.चे माजी अध्यक्ष डॉ.तुषार रंधे, जि. प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार व उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, पंतप्रधान आत्मनिर्भर अभियान संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल रंधे, गटविकास अधिकारी संजय सोनवणे, सरपंच सुखदेव भील, विस्तार अधिकारी आर. जी.पावरा, एस.एस.पवार, बी.सी.सोनवणे, ग्रामविकास अधिकारी डी.आर.पेंढारकर, संजय जगदेव, शामकांत पाटील, संजय पाटील, संजय बडगुजर, सदस्य चंद्रसिंग पवार,भिवसिंग भील, सतीश पवार, बबन पाटील, अनिल पावरा, निलेश महाजन,हारसिंग पावरा, कर्मवीर पतसंस्थेचे चेअरमन शशांक रंधे,राज निकम,संजय पाटील,वासु सत्तेसा,बाळा बडगुजर, अंबादास सगरे, गणेश भामरे, चंद्रसिंग राजपूत, मुकेश जाधव अविनाश सत्तेसा, प्रकाश वाल्हे, समाधान नगराळे, भूषण कुलकर्णी,दिपक भालेराव,सना पावरा, राकेश पावरा, सोन्या बडगुजर, तुषार गोपाळ, शरद पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोराडी ग्रामपंचायततर्फे देव मोगरा माता कॉलनीत गोवर्धन गॅस प्रकल्प उभारण्यात आला आहे. गावातील टाकाऊ कचऱ्याचा उपयोग करून बोराडीत गोर्वधन प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. यामुळे रासायनिक इंधन वापरल्यामुळे होणारे प्रदूषण टाळले जाणार आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या हस्ते करून ज्या दहा जणांना गॅस कनेक्शन देण्यात आले. त्या प्रत्येक घरी जाऊन कुटुंबातील महिलांची विचारपूस व फायदे जाणून घेण्यात आले. याप्रसंगी गोवर्धन प्रकल्पातून नवीन गॅस कनेक्शन मिळालेल्या कुटुंबातील



सर्वांनीच समाधान व्यक्त केले.

बोराडी ग्रामपंचायतने माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये राज्यात प्रथम पुरस्कार मिळविला असून गावात पर्यावरणपुरक उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. समुदाय स्तरावरील बायो-गॅस (जैव-मिथेनेशन) प्लांट बोराडीत बसविला असुन याची दैनंदिन प्रक्रिया क्षमता दररोज २ टन कचरा असुन बोराडीत दररोज गावात कचरा गाड्यांद्वारे ओला कचरा व सुका कचरा संकलीत केला जातो. तसेच भाजीपाला मार्केटमध्ये भाजीपाल्याचा कचरा तयार होतो तो सर्व कचरा या प्रकल्पात वापरला जात आहे. या सर्व कचऱ्याच्या प्रकारावर प्रक्रिया केली जात आहे. या प्रकल्पाची कमाल दैनिक गॅस उत्पादन क्षमता जवळपास ८० घनमीटर गॅस असुन भविष्यात या पर्यावरणपुरक प्रकल्पाची क्षमता वाढविण्यात येणार आहे.

## सुराय येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

■ मालपूर । वार्ताहर

शिंदखेडा तालुक्यातील सुराय येथे रिलायन्स फाऊंडेशन अंतर्गत डिजिटल फार्मर स्कूलच्या माध्यमातून ऑडीओ कॉन्फरन्स, युट्यूब, व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कापुस उत्पादक शेतकरी बांधवांना पेरणी, जमीन मशागत, पेरणी पूर्व आणि पेरणी नंतर घ्यावयाची काळजी, अंतर पीक पद्धती, सापळा पीक पद्धत, बीजप्रक्रिया, बेसल डोस पीक पद्धत आणि त्याचे फायदे या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जमिनीची मशागत, बियाण्यांची निवड, माती परिक्षण, पेरणी पद्धत, पेरणीची योग्य वेळ, खत व्यवस्थापन या विषयावर शेतकऱ्यांनी प्रश्न विचारले. व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातुन कृषी शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र जाने यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे सविस्तर देण्यात आली,तसेच कार्यक्रमाचे आयोजन रिलायन्स फाऊंडेशन चे जिल्हा समन्वयक नितीन कोल्हे यांच्या मार्गदर्शनातून करण्यात आले.शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## निर्यातक्षम फळबागांची नोंदणी करा

■ धुळे । प्रतिनिधी

निर्यातक्षम फळे व भाजीपाला पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी हॉर्टीनेट प्रणालीवर निर्यातक्षम पिकांची शेतनोंदणी करावी, असे आवाहन नाशिक विभागीय कृषि सहसंचालक मोहन वाघ यांनी केले आहे. राज्यात नाशिक विभाग निर्यातक्षम नोंदणीत प्रथमस्थांनावर आहे.गतवर्षीच्या तुलनेत सद्य स्थितीत शेतनोंदणी अत्यंत अल्प झाली असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी निर्यातक्षम पिकांची शेतनोंदणी संबंधित प्रणालीवर करावी, अधिक माहितीसाठी कृषि सहायक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन श्री.वाघ यांनी केले आहे.

## स्वस्त धान्य वितरणात येणाऱ्या अडचणी सोडवा

### शिंदखेडा तालुका स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारकांचे धरणे

■ शिंदखेडा । प्रतिनिधी

राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मार्जीनमध्ये महागाईच्या निर्देशांकानुसार किमान ५० रुपये प्रतिक्विंटल इतकी वाढ करण्याच्या मागणीला शासनासोबत सकारात्मक चर्चा झाली होती. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने सकारात्मकता दाखविली होती. मात्र अद्यापपर्यंत याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याने तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी तालुक्यातील रास्त भाव दुकानदार व केरोसीन परवानाधारकांनी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यावेळी तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

शासकीय धान्य गोदामातून येणाऱ्या धान्याच्या गोणीचे प्रत्यक्ष दुकानांमध्ये वजन करून देण्यात यावे. अस्वच्छ आणि खराब धान्याचा पुरवठा करण्यात येवु नये. ई-केवायसी ही निरंतर प्रक्रिया असायला हवी, त्यासाठी वेळेचे बंधन नसावे. सर्व प्रकारच्या प्रलंबित मागील



रकमा त्वरित अदा कराव्या. यासह विविध मागण्यांसाठी १० जानेवारी रोजी अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाची अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत या विविध मागण्यांसंदर्भात सकारात्मक चर्चा झाली होती. परंतु या बैठकीला सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होऊनही शासनाने या संदर्भात कोणतीही अंमलबजावणी केली नाही अथवा अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी कोणतीही बैठक बोलावली नाही. त्यामुळे महासंघाच्या या विविध मागण्यांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात त्रिस्तरीय आंदोलन करण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून २७ जून रोजी तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात तालुकाध्यक्ष आर. आर. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष भाईदास पाटील, उपाध्यक्ष तुषार पाटील, रवींद्र गिरासे, राजेंद्रसिंह राजपूत, सचिव सुरेश कुंभार, सदस्य नानाभाऊ पाटोळे, सुधाकर पाटील, विजय पाटील, संगीता परदेशी, सुनीता भामरे, डी.एस.पाटील, डिगंबर वाणी, सोमवंशी, भटू पाटील आदींसह तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक सहभागी झाले होते.

# मोराणेत अल्पवयीन मुलीचा विनयभंग, एकावर गुन्हा

■ धुळे । प्रतिनिधी

तालुक्यातील मोराणे गाव शिवारात अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत १४ वर्षीय मुलीने तालुका पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, गावातील विलास रमेश चव्हाण याने मागावून अचानक येवून हात धरून लज्जास्पद कृत्य केले. तसेच तु माझ्या सोबत पुणे येथे चल व माझ्याशी लग्न कर, नाहीतर तुझा भाऊ व वडीलांना मारून टाकेल, अशी धमकी दिली. दि. २५ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी विलास चव्हाण याच्याविरोधात भादंवि कलम ३६६, ३५४, ३५४ (ड), ५०४, ५०६ सह पोस्को अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पीएसआय दीपक धनवटे करीत आहेत.

**महिलेसह दोघांना मारहाण-** धुळे शहरातील नॅशनल उर्दु हायस्कूलच्या गेटजवळ महिलेची छेडखानी करीत तिच्यासह एकाला मारहाण करण्यात आली. तसेच एकास रॉडने मारून जखमी केले. याप्रकरणी चौघांवर चाळीसगाव रोड पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत अजमेरा नगरात राहणाऱ्या शाहिन बी सैय्यद कदीर (वय ३५) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, दि. १६ जुन रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास अजमेरा नगरातील नॅशनल उर्दु हायस्कूलच्या गेटजवळ जैन रशिद मुल्ला, उमेद रशिद मुल्ला (रा. अजमेरा नगर) व गुड्डु उर्फ कलेजीवाला (रा. हाजी अपार्टमेंट) व समिर (रा. बहरे मदीना मशीदजवळ) यांनी हातवारे इशारे करून हसु लागले. त्यांना याचा जाब विचारला असता चौघांनी फिर्यादीसह रेहान रफिक शेख यांना शिवीगाळ करीत हाताबुक्यांनी माराहण केली. तर जैद राशिद मुल्ला याने रेहान यास लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जखमी केले. तसेच दोघांना जिवे मारण्याची धमकी दिली. पुढील तपास पोहेकाँ पाटील करीत आहेत.

**गायीची सुटका, तिघांवर गुन्हा-** धुळे शहरातील मोहाडी उपनगरातील भटाई माता चौकात बुधवारी सायंकाळी काही तरूणांनी संशयीतरित्या गाय घेवून जाणाऱ्या तिघांना पकडले. ते गायीला निदर्यपणे कत्तलीसाठी घेवून जात होते. त्यांच्याकडून ५ हजारांची गाय व ५० हजारांची एमएच १८ बीके २५९२ क्रमांकाची दुचाकी पोलिसांनी जप्त केली. तसेच नुरोद्दीन जलालुद्दीन शहा व दोन अल्पवयीन मुलांना (रा. जामचामळा) ताब्यात घेतले. तिघांविरोधात रोहीत विभांडीक (रा. सर्वोदय कॉलनी) याच्याफिर्यादीवरून मोहाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकाँ शिरसाठ करीत आहेत.

क्राईम

**टेरेसवरून खाली पडून तरूणाचा मृत्यू-** धुळे पेट्रोल पंपाच्या ऑफिसच्या टेरेसवरून खाली पडल्याने तरूणाचा मृत्यू झाला आहे. अनिल अशोक भालेराव (वय ३४ रा. मुकूंदवाडी, संतोषी माता नगर, संभाजीनगर) असे त्याचे नाव आहे. तो धुळे तालुक्यातील जुनवणे गावाजवळ एच.पी.पेट्रोल पंप येथे काम सुरू असतांना मित्रासह पेट्रोल पंपाच्या ऑफिसच्या टेरेसवर गप्पा मारण्यासाठी गेले होते. तेव्हा अनिल यास भोवळ आल्याने खाली कोसळला. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करीत मृत घोषित केले.

## सदोष मनुष्यवधप्रकरणी दोघांना आठ वर्षांची शिक्षा

■ धुळे । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यातील वर्षी येथील संजय कोळी यांचा दोन जणांनी खून केला होता. याप्रकरणी धुळे येथील सत्र न्यायमुर्ती डी.एम. आहेर यांनी दोघा आरोपींना प्रत्येकी आठ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली असून आरोपी प्रकाश पांचाळ याला तीन महिने कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. या निकालाकडे वर्षी गावासह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून होते.

वर्षी ता. शिंदखेडा येथील लिना ज्ञानेश्वर कोळी (वय ९)ही ३ सप्टेंबर २०२१ रोजी गावातील खालची भिलाटीत काकडी विकायला गेली होती. तेथील प्रकाश भिमराव पांचाळ याने दहा रूपयांची काकडी घेतली. परंतु, पैसे दिले नाही व लिना हीस मारहाण करून परत पाठविले. हीबाब लिना हिने तिचे काका फिर्यादी युवराज मंडाले यांस सांगितले. त्यानुसार युवराज हा लिना हिस सोबतव घेवून प्रकाश पांचाळकडे गेला. त्यानंतर सदरची माहिती संजय निबा कोळी व विजय निंबा कोळी या दोघांना समजली. त्यानंतर ते सुध्दा त्याठीकाणी पोहचले. त्यावेळेस प्रकाश पांचाळ हा लोखंडी पास घेवून फिर्यादीच्या अंगावर धावून आला. तसेच विशाल पांचाळ व मुकेश पाचांळ यांनी संजय यास मारहाण करून त्याचे डोके जमीनीवर आपटले व त्यास जीवे ठार मारले.

याप्रकरणी नरडाणा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी याप्रकरणी सखोल तपास करून न्यायालयात आरोप पत्र दाखल केले.हा खटला सत्र न्यायमुर्ती डी.एम. आहेर यांच्या समोर चालविण्यात आला. त्यात फिर्यादी पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल देवेंद्रसिंह योगेंद्रसिंह तवर यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार युवराज मंडाले, विजय मंडाले व बालसाक्षीदार लिना यांचे सह एकूण ८ साक्षीदार तपासले. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल देवेंद्रसिंह तवर यांनी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या विविध प्रकरणाचे दाखले देत प्रभावी युक्तीवाद केला. तसेच मयत संजय याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्या कारणाने त्यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्याबाबत सुध्दा युक्तीवाद केला.

याप्रकरणी न्यायमुर्ती डी. एम. आहेर यांनी आरोपी विशाल पांचाळ व मुकेश पांचाळ यांना संजय कोळी याचा सदोष मनुष्य वध केल्याचे दोषी धरून दोघांना प्रत्येकी ८ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. तसेच आरोपी प्रकाश पांचाळ याला भांदवी कलम ३५२ अन्वये दोषी धरत ३ महिने कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. या खटल्यात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल देवेंद्रसिंह तवर यांनी कामकाज पाहिले. त्यांना मुळ फिर्यादीचे वकिल अॅड. जयपाल कोळी तसेच अॅड. मयुर मेघराज बैसाणे यांचे सहकार्य लाभले. तसेच तपासी अंमलदार मनोज ठाकरे व पैरबी अधिकारी साहेबराव मोरे यांचे देखील सहकार्य लाभले.

न्यायमुर्ती डी.एम. आहेर यांनी याप्रकरणात जिल्हा विधी सेवा प्राधीकरण यांचा मयत संजय कोळी याच्या परिवारास चौकशी करून योग्य ती नुकसान भरपाई द्यावी, असेही आदेश दिले आहे.



## पिंपळनेर ग्रामीण रुग्णालयात उबाठा सेनेतर्फे वृक्षारोपण

■ पिंपळनेर । वार्ताहर

शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे येथील ग्रामीण रुग्णालय परिसरात डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी पिंपळनेर तालुका समन्वयक ज्ञानेश्वर पगारे, तालुका संघटक तुषार गवळी, उपतालुका प्रमुख मनोज खैरनार, शिवसेना पिंपळनेर शहरप्रमुख महेश वाघ, शहर समन्वयक उदय बिरारी, शहर संघटक अतुल चौधरी, उपशहर प्रमुख बाबा शेख, युवासेना उपशहर प्रमुख मयूर नांद्रे, युवासेना उपशहर प्रमुख पवन सोनवणे, शाखाप्रमुख स्वप्नील चित्ते, शिवसैनिक बाप्पा कोठावदे आदींसह रूग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

भारत | कॅनडा | आयर्लंड | पाकिस्तान | युनायटेड स्टेट्स | ऑस्ट्रेलिया | इंग्लंड | नामीबीया | ओमान | स्कॉटलॅंड | अफगाणिस्तान | न्यूझीलंड | पपुआ न्यू गिनी | युगांडा | वेस्ट इंडिज | बांगलादेश | दक्षिण आफ्रिका | श्रीलंका | नेपाळ | नेदरलॅंड्स

# भारत-दक्षिण आफ्रिकेत आज अंतिम लढत

## सामन्यावर पावसाचे सावट कायम









**बार्बाडोस । वृत्तसंस्था**

टी२० वर्ल्डकप स्पर्धेतील जेतेपदाचा निकाल आता काही तासांवर येऊन ठेपला आहे. २९ जूनला भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात लढतीला सुरुवात होणार आहे. पण या सामन्यावरही पावसाचे सावट असल्याने भारतीय क्रीडाप्रेमींची धाकधूक वाढली आहे. रिपोर्टनुसार या सामन्यात ७० ते ८० टक्के पाऊस पडेल असा अंदाज आहे. त्यामुळे या सामन्यात पावसामुळे वारंवार खंड पडू शकतो. उपांत्य फेरीत याचा अंदाज आला आहे. पावसाच्या व्यत्ययामुळे क्रीडाप्रेमींच्या उत्साहावर विरजण पडू शकते. इतकंच काय तर राखीव दिवशीही पाऊस पडेल असा अंदाज आहे. त्यामुळे या सामन्याचा निकाल कसा लागेल याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात २९ जूनला अंतिम फेरीचा सामना होणार आहे. या सामन्यासाठी एक दिवस राखीव ठेवला आहे. पावसाच्या व्यत्ययामुळे सामना झाला नाही तर ३० जूनला हा सामना होईल. पावसाच्या व्यत्ययात निकाल देण्यासाठी दोन्ही संघांनी कमीत कमी १० षटकं खेळणे गरजेचे आहे. जर दहा षटकांचा सामना झाला नाही तर हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल.

अंतिम सामन्यासाठी अतिरिक्त वेळ दिला गेला आहे. एकूण ३ तास १० मिनिटांचा अतिरिक्त अवधी असेल. जर या अतिरिक्त वेळेत सामना पूर्ण झाला नाही तर मात्र राखीव दिवशी खेळवला जाईल.

सामना ठरलेल्या दिवशी म्हणजेच २९ जूनला करण्याचा मानस आहे. मग १०-१० षटकांचा सामना करण्याचा प्रयत्न असेल. पण तरीही पावसामुळे हा सामना झालाच नाही, तर मग राखीव दिवसाचा वापर केला जाईल. पावसामुळे षटकं कमी केली गेली आणि पुन्हा पावसाच्या व्यत्ययामुळे सामना झाला नाही तर मग राखीव दिवशी जिथे सामना थांबला तेथून सुरुवात होईल. एका संघाने ९ षटकं खेळली आणि पाऊस आला तर १७-१७ षटकांचा सामना होईल. पण तेव्हा एकही चेंडू टाकला गेला नाही, तर मात्र दुसऱ्या दिवशी नव्याने सामना सुरु होईल. म्हणजेच २० षटकांचा खेळ असेल. राखीव दिवशी पाऊस पडला तर षटकं कमी केली जातील.

दुसरं, ठरलेल्या दिवशी एक संघ ९ षटकं खेळला असेल आणि पावसामुळे १७ षटकांचा खेळ केला असेल. पाऊस थांबल्यानंतर एक जरी षटक टाकले गेले आणि खेळ थांबवण्याची वेळ आली, तर मात्र खेळ जिथे थांबला आहे तेथून राखीव दिवशी सुरु होईल.

## भारताचे चार खेळाडू जिंकवून देणार ट्रॉफी





**बार्बाडोस । वृत्तसंस्था**

भारताने २०१३ मध्ये इंग्लंडला पराभूत करत आयसीसीची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. त्यानंतर भारताने सातत्याने उपांत्य फेरी किंवा अंतिम फेरी गाठली आहे. पण टीम इंडियाला ट्रॉफी जिंकता आली नाही. आता टीम इंडियाला पुन्हा एकदा आयसीसी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात पोहोचली आहे. बार्बाडोस येथे २९ जून रोजी आयसीसी टी२० विश्वचषक २०२४ च्या अंतिम फेरीत भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. या सामन्यात ४ खेळाडू फार महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

भारतीय संघाचा जादूगार फिरकी गोलंदाज कुलदीप यादव यांचा वेस्ट इंडिजच्या लेगमध्ये प्लेइंग ११ मध्ये समावेश करण्यात आला आहे. कुलदीपने आतापर्यंत खेळलेल्या केवळ ४ सामन्यांत १० विकेट घेतले आहेत. उपांत्य फेरीत त्याने इंग्लंडविरुद्ध ३ विकेट घेतले होते. यादव आफ्रिकेच्या विरुद्ध चांगली खेळी करु शकतो.

भारताचा स्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादवने या विश्वचषकात भारतासाठी काही चांगल्या खेळी खेळल्या आहेत. या विश्वचषकात त्याने ७ सामन्यात १९६ धावा केल्या आहेत. तो आफ्रिकेविरुद्ध मोठी खेळी खेळू शकतो.

भारतीय संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल सध्या बॅट आणि बॉल दोन्हीने चांगली कामगिरी करत आहे. त्याने इंग्लंडविरुद्ध ३ विकेट घेत निर्णायक भूमिका बजावली. शेवटी फलंदाजीला आल्यावर त्याने षटकारही मारला. त्याच्या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्याला सामनावीराचा पुरस्कारही देण्यात आला. अक्षरकडून दक्षिण आफ्रिके विरुद्ध चांगल्या खेळीची अपेक्षा आहे.

विश्वचषकात भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माची बॅट चांगलीच चालत आहे. तो या स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा तिसरा खेळाडू आहे. त्याने ७ सामन्यात २४८ धावा केल्या आहेत. रोहितने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९२ आणि इंग्लंडविरुद्ध ५७ धावा केल्या होत्या. अंतिम फेरीत तो दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपल्या फलंदाजीने आफ्रिकेविरुद्ध चांगली खेळी करु शकतो.

## ऋषभ पंतला सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचे पदक प्रदान

**गयाना । वृत्तसंस्था**

१० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर भारतीय क्रिकेट संघाने अखेर विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. काल रात्री टी-२० विश्वचषक २०२४ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताने इंग्लंडचा ६८ धावांनी पराभव करत अंतिम फेरीतील धडक मारली. त्यामुळे आता सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. अशात बीसीसीआयने भारतीय संघाच्या ड्रेसिंगरुमधील व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये भारतीय संघाचे क्षेत्ररक्षक कोच टी दिलीप आणि माजी क्रिकेटपटू दिनेश कार्तिक सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचे पदक प्रदान करताना भारतीय संघाचे कौतुक केले.



**कार्तिकने टीम इंडियाचे केले कौतुक**

दिनेश कार्तिकने २२ यार्डवरून सुट्टी घेतली असली तरी तो अजूनही कॉमेंट्रीच्या माध्यमातून खेळाशी जोडला गेला आहे. दरम्यान, कार्तिकचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये तो इंग्लंडविरुद्धचा सामना जिंकल्यानंतर टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूममध्ये दिसत होता आणि यादरम्यान त्याने काही खास केले. विशेष काम करण्यापूर्वी टीम इंडियाच्या ड्रेसिंग रूममध्ये पोहोचलेल्या दिनेश कार्तिकने एक खास भाषण केले, जे २०२२ मध्ये टीम इंडियाच्या पराभवाशी संबंधित होते आणि त्यादरम्यान त्यांनी भारतीय संघाच्या खेळाडूंचे कौतुक केले. कर्णधार रोहित व्यतिरिक्त, त्याने राहुल द्रविडबद्दल देखील बोलले आणि टीम इंडियाचे सर्व खेळाडू कार्तिकच्या आगमनाने खूप उत्साहित दिसत होते. यावेळी सर्वांनी टाळ्या वाजवल्या आणि हे दृश्य पाहण्यासारखे होते.

## विराटने सर्वोत्तम खेळी फायनलसाठी राखून ठेवली असावी

### रोहित शर्माचे भारताच्या विजयानंतर विधान



**गयाना । वृत्तसंस्था**

भारताने इंग्लंडचा ६८ धावांनी पराभव करत टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामन्यात धडक मारली आहे. भारताच्या अक्षर पटेल आणि कुलदीप यादव या फिरकीच्या जोडीपुढे इंग्लंडचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. या दोघांनीही प्रत्येकी ३-३ विकेट्स घेतल्या. याशिवाय भारताच्या विजयात कर्णधार रोहित शर्माचीही भूमिका महत्त्वाची होती. रोहित शर्माने उपांत्य फेरीच्या सामन्यानंतर अनेक वक्तव्ये केली आहेत. टीम इंडियाने १० वर्षांनंतर टी-२० वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. जिथे त्यांचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे.

**रोहित शर्मा काय म्हणाला?**

इंग्लंडविरुद्धच्या विजयानंतर रोहित शर्मा म्हणाला की, हा सामना जिंकल्याचं खूप समाधान आहे. आम्ही एक युनिट म्हणून खूप मेहनत घेतली. हा सामना जिंकण्यासाठी सर्वांनीच खूप प्रयत्न केले. आम्ही परिस्थितीशी खूप चांगले जुळवून घेतले. तेथील परिस्थितीशी जुळवून घेणे हे एक आव्हान होते पण आम्ही या परिस्थितीशी जुळवून घेतलं आणि या टूर्नामेंटमधील विजयाचे हेच मोठं कारण आहे. गोलंदाज तर कमाल होते.

विराट कोहलीबाबत रोहित शर्मा म्हणाला की, कोहली एक उत्कृष्ट खेळाडू आहे. कोणताही खेळाडू खराब फॉर्ममधून जाऊ शकतो. त्याची खेळण्याची पध्दत आणि अशा मोठ्या सामन्यांमधील त्यांचे महत्त्व आम्हाला माहित आहे. १५ वर्ष खेळलेल्या खेळाडूसाठी फॉर्म हा चिंतेचा विषय नाही. त्याने सर्वोत्तम खेळी फायनलसाठी राखून ठेवली असावी.

## भारताच्या विजयानंतर रोहितच्या डोळ्यात तरळले ‘विजयाश्रू’

### विराट कोहलीने साधला ‘हिटमॅन’शी संवाद



**गयाना । वृत्तसंस्था**

रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने इंग्लंडचा पराभव करत २०२२ च्या उपांत्य फेरीतील पराभवाचा मोठा बदला घेतला. भारताने इंग्लंडचा ६८ धावांनी पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या या ऐतिहासिक विजयानंतर टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा भावूक झाला. रोहित ड्रेसिंग रूमबाहेर एकटाच बसला होता. विराट कोहली हात मिळवायला जाताच रोहितने हात डोळ्यावर घेतले आणि विराट त्याच्याशी काहीतरी बोलताना दिसला. रोहितचा ड्रेसिंग रूमबाहेरील हा फोटो आणि व्हीडिओ व्हायरल होत आहे.

रोहित शर्माला विराटने सावरले

रोहितच्या सामन्यानंतरच्या या व्हायरल फोटोमध्ये तो मान खाली घालून हात डोळ्यावर घेऊन बसल्याचे दिसत आहे. त्याच्या बाजूला विराट कोहली उभा आहे. जो त्याच्याशी बोलताना दिसत आहे. हा फोटो सोशल मीडियावर अनेकांनी शेअर केला आहे.

इंग्लंडविरुद्धच्या या शानदार विजयानंतर रोहित शर्माच्या कर्णधारपदाचे कौतुक होत आहे. रोहितच्या नेतृत्त्वाखालील संघाने चमकदार कामगिरी करत १० वर्षांनंतर अंतिम फेरी गाठली आहे. याशिवाय गेल्या दोन सामन्यांमध्ये रोहितने सलग अर्धशतके झळकावत भारताला मोठी धावसंख्या रचण्याचा पाया घालून दिला. रोहितने इंग्लंडविरूद्धच्या सामन्यातही शानदार ५७ धावांची खेळी करत सूर्यासोबत चांगली भागीदारी रचली. जेणेकरून भारतीय संघ इंग्लंडला १७२ धावांचे आव्हान देऊ शकला. तर प्रत्युत्तरात अक्षर आणि कुलदीपच्या फिरकीसमोर इंग्लंडचा संघ १०३ धावा करत ऑल आऊट झाला.

## विधीलिखित

**सुरेशराव बोरकर,**
**ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.**
**मो. : ९८५००१५५५८**

**शनिवार, दि. २९ जून २०२४**

***-*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*-***

**मेष** – मनासारखे वातावरण राहणार नाही.
**वृषभ** – प्रेम प्रकरणे असतील तर ही प्रकरणे पुढे चालतील.
**मिथुन** – सर्व काही व्यवस्थित होत राहील.
**कर्क** – विचार न करता नवीन कार्य सुरु करावे.
**सिंह** – अडथळ्यांचा दिवस असणार आहे.
**कन्या** – वाहन शक्यतोवर चालवू नका.
**तूळ** – संततीकडून आनंददायक समाचार कळेल.
**वृश्चिक** – नवीन कार्य कराल.
**धनू** – कुटूंबासाठी वेळ देणे समाधानकारक ठरेल.
**मकर** – खूप कार्य आज करावे लागेल.
**कुंभ** – पैसा सर्व काही असतो हा गैरसमज दूर होईल.
**मीन** – मनासारखे झाले, पण इतरांचे काय?

## धोनी-बाबरला मागे टाकत रोहित शर्माने रचला इतिहास!



**गयाना । वृत्तसंस्था**

टीम इंडिया आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ च्या फायनलमध्ये पोहोचली आहे. गयानाच्या प्रोव्हिडन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडचा ६८ धावांनी पराभव केला. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाची कामगिरी या स्पर्धेत आतापर्यंत चांगलीच राहिली आहे. संघाने आतापर्यंत एकही सामना न गमावता अंतिम फेरी गाठली आहे. टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचताच रोहित शर्माने एमएस धोनीला एका खास विक्रमात मागे टाकले आहे.

**धोनीला टाकले मागे**

भारतीय संघाने सलग तिसऱ्या आयसीसी स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. याआधी भारतीय संघ कसोटी चॅम्पियनशिप आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना खेळला होता. या तीन प्रसंगी भारतीय संघाची कमान रोहित शर्माच्या हाती राहिली आहे. अशा परिस्थितीत टीम इंडियाला तिन्ही फॉरमॅटमध्ये आयसीसी टूर्नामेंटच्या अंतिम फेरीत पोहोचवणारा तो भारताचा पहिला कर्णधार ठरला आहे.

**बाबर आझमलाही टाकले मागे**

रोहित शर्माचा कर्णधार म्हणून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील हा ४९ वा विजय आहे. यासह टी-२० आंतरराष्ट्रीय सर्वाधिक सामने जिंकणारा कर्णधार बनला आहे. त्याने बाबर आझमचा विक्रम मोडला आहे. बाबर आझमच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानने ४८ सामने जिंकले आहेत, मात्र रोहित आता त्याच्या पुढे गेला आहे. यासोबतच युगांडाचा कर्णधार ब्रायन मसाबा ४५ विजयांसह तिसऱ्या स्थानावर आहे.





देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, अमर चित्र मंदिर चौक, नंदुरबार-४२५४१२ येथे प्रसिध्द केले. ● **व्यवस्थापकीय संपादक : विक्रम सारडा.** ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४. **RNI.No. 69123/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk